रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २०६
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलमध्ये लोकसहभागातून होणार शिवजयंती उत्सव/३
गंभीर आजारात दिलासा देणार पॅलिएटिव्ह केअर सेवा/५
वर्ल्डकपमध्ये रंगला दोन सुपर ओव्हरचा थरार/८

## एसटी प्रवासाचा आता नवा डिजिटल युगारंभ



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत. यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे. एसटीचा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# राजिपमध्ये भाजपची गट नोंदणी

## वैकुंठ पाटील यांची गटनेतेपदी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित सदस्यांनी बुधवारी (दि. ११) जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन आपल्या गटाची नोंदणी केली. माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांची भाजपच्या गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे १५ सदस्य निवडून आले आहेत. या सदस्यांची गट नोंदणी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात हजर राहून व सर्व सदस्यांची ओळख पटवून करण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पडली. या वेळी भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील उपस्थित होते.



जिल्हाधिकारी कार्यालयातील गट नोंदणीपूर्वी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक अलिबाग येथील भाजपच्या कार्यालयात झाली. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांची सर्वानुमते गटनेतेपदी निवड करण्यात आली. सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

ज्या विश्वासाने जनतेने आमच्या सहकाऱ्यांना निवडून दिले आहे, तो पात्र ठरवण्यासाठी तसेच जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचे सर्व सदस्य काम करतील, असे या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

दरम्यान, रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १६ सदस्य निवडून आले आहेत. या सर्व सदस्यांनीही बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या गटाची नोंदणी केली. राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी ज्येष्ठ नेते मधुकर पाटील यांनी निवड करण्यात आली आहे.

# रितू तावडे मुंबईच्या महापौरपदी

## उपमहापौरपदी संजय घाडी यांचीही बिनविरोध निवड



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या महापौरपदी भाजपच्या रितू तावडे आणि उपमहापौरपदी शिंदे सेनेचे संजय घाडी यांची बिनविरोध निवड झाली आहे. या पदांसाठी प्रतिस्पर्धी शिवसेना उबाठाकडून उमेदवारी अर्ज सादर न केल्याने निवडीची औपचारिकता पार पडली. त्यामुळे तब्बल ४४ वर्षांनी भाजपचा महापौर मुंबई महापालिकेत विराजमान झाला आहे.

मुंबई महापालिका सभागृहात महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक बुधवारी (दि. ११) दुपारी पार पडली. या निवडणुकीत पिठासीन अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी कामकाज पाहिले. या निवडणुकीला सुरुवात होतात उबाठा गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे पिठासीन अधिकारी म्हणून नावाने अध्यादेश काढत आजवरच्या प्रथा आणि परंपरेला छेद दिल्याचा आरोप करत पिठासीन अधिकाऱ्यांना धारेवर धरण्याचा प्रयत्न केला, पण पिठासीन अधिकारी यांनी यावर उत्तर देत त्यांचा मुद्दा उडवून लावला.

यानंतर पिठासीन अधिकाऱ्यांनी निवडणुकीला सुरुवात करत महापौरपदासाठी एकमेव अर्ज आल्याने रितू तावडे यांची निवड या पदासाठी करत असल्याचे घोषित केले. त्यानंतर उपमहापौरपदासाठीही एकमेव अर्ज आल्याने संजय घाडी यांची निवड जाहीर केली. या दोघांच्या निवडीनंतर सर्व सदस्यांनी बाके वाजवत त्यांचे स्वागत केले.

या वेळी सभागृहाच्या गॅलरीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई शहराचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम, माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार अमित साटम, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ उपस्थित होते. त्यांनी नवनियुक्त महापौर आणि उपमहापौरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

> **नवनियुक्त महापौर, उपमहापौर आणि सर्व सदस्य मिळून मुंबई महापालिकेला एक नवी प्रगतीशील दिशा देतील. सामान्य मुंबईकरांनी जे विश्वासाने महायुतीला निवडून दिले आहे, त्यांची सर्व स्वप्ने पूर्ण करण्याचे काम ही नवी टीम करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.**
> **–देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, शिवसेना–भाजप महायुतीचे हे यश मुंबईकरांनी दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. निवडणूक काळात मी आणि एकनाथ शिंदे यांनी मुंबईकरांकडे लोकाभिमुख आणि पारदर्शी प्रशासनासाठी मते मागितली होती. जनतेने दिलेल्या प्रतिसादानुसारच आज महायुतीचे दोन्ही शिलेदार पदावर विराजमान झाले आहेत. राज्य सरकारने मुंबईच्या विकासाचा जो भव्य कार्यक्रम हाती घेतला आहे, तो आता महापालिकेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे राबवला जाईल.

# मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पिल्लई विद्यापीठाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसराच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई विद्यापीठाचा उद्घाटन सोहळा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. १०) मोठ्या उत्साहात झाला.

या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, विद्यापीठाचे संस्थापक डॉ.के.एम. वासुदेवन पिल्लई, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आदींची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांनी विद्यापीठ परिसराची सविस्तर पाहणी केली. या वेळी त्यांनी कॅम्पसमधील अत्याधुनिक प्रयोगशाळा, जागतिक दर्जाची संशोधन केंद्र आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या स्टार्टअप उपक्रमांचे विशेष कौतुक केले. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या सुविधांची पाहणी करताना शिक्षण क्षेत्रातील या बदलांना भविष्यातील विकसित भारताचा पाया असल्याचे म्हटले.





या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, पिल्लई विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र नसून ते संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून विकसित भारत २०४७च्या दिशेने देशाला नेणारे एक महत्त्वाचे केंद्र ठरेल. या विद्यापीठामुळे आता विद्यार्थ्यांना मायदेशातच जागतिक दर्जाचे शिक्षण, ड्रोन तंत्रज्ञान आणि एआयसारख्या आधुनिक विषयांत संशोधनाची संधी मिळणार आहे. **(पान २ वर..)**

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा दिल्ली दौरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बुधवारी (दि. ११) दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आदींची भेट घेतली. या वेळी पंतप्रधानांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या.

या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, पार्थ पवार, जय पवार हेही सहभागी झाले होते.

## 🔍 नि व ड क


### गोळीबाराच्या घटनांनी थायलंड, कॅनडा हादरले

**बँकॉक, ब्रिटिश कोलंबिया :** थायलंड आणि कॅनडामध्ये शाळांवर गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. थायलंडमध्ये एका माजी पोलीस अधिकाऱ्याने डे–केअर सेंटरमध्ये अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात २२ लहान मुलांसह एकूण ३४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया भागात टम्बलर रिज शाळेत झालेल्या या हल्ल्यात गोळीबार करणाऱ्यासह किमान १० जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय २५पेक्षा जास्त लोक जखमी झाले असून त्यातील दोन जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे.

### राहुल गांधींच्या आरोपांना केंद्रीय मंत्र्यांकडून उत्तर

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर दिले आहे. एपस्टीन फाइल्सवरून राहुल गांधींनी जे आरोप माझ्यावर केले आहेत, त्यांना काहीही अर्थ नाही. ते सगळे आरोप बिनबुडाचे आहेत, असे पुरी यांनी म्हटले आहे. याबरोबरच ते एपस्टीनला फक्त इंटरनॅशनल पीस इन्स्टिट्यूटच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून भेटले होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# राज ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरले –कोश्यारी



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मुंबईत केलेल्या उद्बोधनावर मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी टीका केली. त्यानंतर भाजपसह संघ वर्तुळातून राज यांच्या विधानाचा कठोर शब्दांत समाचार घेतला जात आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीदेखील सरसंघचालकांच्या उद्बोधनाला आलेले मान्यवर नव्हे, तर राज ठाकरेच पंतप्रधान नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत, असा टोला लगावला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुंबईतील कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाची भूमिका, कार्यपद्धती आणि समाजातील योगदान या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. त्यामुळे या कार्यक्रमाची देशभरात चर्चा झाली. या कार्यक्रमानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर लांबलचक पोस्ट लिहून टीका केली. कार्यक्रमाला आलेली मंडळी संघप्रेमापोटी नव्हती, तर सरकारच्या दबावामुळे किंवा भीतीमुळे आली होती, असा आरोप त्यांनी केला तसेच ही उपस्थिती संघासाठी नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भीतीपोटी असल्याचे त्यांनी म्हटले.

राज ठाकरे यांच्या या भूमिकेवर भगतसिंह कोश्यारी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, संघाच्या कार्यक्रमाला लोक पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरून आले नव्हते. उलट राज ठाकरेच मोदींना जास्त घाबरतात. त्यांनी मोदींना घाबरू नये, तर त्यांच्या जवळ जावे. राज ठाकरे माझे लहान भाऊ आहेत. ते वाणीने कडक असले तरी चांगले नेते असल्याचेही कोश्यारींनी नमूद केले.

# उलवेतील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा स्पर्धा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची (आरटीपीएस) द्वितीय वार्षिक क्रीडा स्पर्धा बुधवारी (दि. ११) अत्यंत उत्साह, शिस्त आणि विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागात यशस्वीरित्या पार पडली. संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पर्धेस भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.





क्रीडा स्पर्धेची सुरुवात नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी यांच्या हस्ते मैदान पूजनाने झाली. त्यानंतर गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते क्रीडा ध्वजाचे रोहण करण्यात आले, तर आरटीपीएसचे चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन व मशाल धाव या समारंभाने एकता, परंपरा आणि क्रीडाभावनेचे प्रतीक साकारले.

स्पर्धेस संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, आरटीपीएस खारघरच्या प्राचार्य राज अलोनी, कार्यकारी मंडळ सदस्य प्रकाश भगत, हरिभाऊ पाटील, ॲड. राहुल घरत, वसंत पाटील, एलआरटीपीएस कामोठेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, एमएनएम ॲण्ड टीएनजी कनिष्ठ महाविद्यालय गव्हाण–कोपरच्या प्राचार्य, सायली वाडवलकर, आरटीपीएस खारघरच्या को–ऑर्डिनेटर चश्मिंदर बक्षी, जयवंत देशमुख, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, विश्वनाथ कोळी, किशोर पाटील, मिनाक्षी पाटील, किशोर कोळी, श्रीकांत घरत, साईचरण म्हात्रे, दिपाली म्हात्रे, आरटीपीएस उलवेचे प्राचार्य किरणकुमार सुथार आदी उपस्थित होते.

गंगा, यमुना, नर्मदा आणि गोदावरी या चार हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध मार्च पास्टमधून समन्वय, नेतृत्व आणि हाऊसचा अभिमान प्रकर्षाने दिसून आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथ घेऊन प्रामाणिकपणा, न्याय आणि समर्पणाची प्रतिज्ञा केली.

या क्रीडा स्पर्धेत विविध वयोगटांसाठी धावण्याच्या शर्यती तसेच पालकांची रस्सीखेच स्पर्धा रंगली. उपक्रमाचा समारोप पारितोषिक वितरण समारंभाने झाला, ज्यामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या वर्षीची सर्वोत्कृष्ट हाऊस ट्रॉफी गंगा हाऊसने पटकावली. त्यांचे कौतुक झाले.

# देशातील पहिला संगीतमय मार्ग मुंबईमध्ये

## कोस्टल रोडवरील प्रवास आता मनोरंजक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वरळी आणि मरिन ड्राईव्हला जोडणाऱ्या धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्ग (कोस्टल रोड) देशातील पहिला संगीतमय रस्ता बनला आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या मुंबईकरांचा प्रवास मनोरंजक होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ११) या म्युझिकल रोड प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी मुख्यमंत्र्यांचे वाहन या संगीतमय पट्ट्यांवरून धावत असताना स्लमडॉग मिलेनियर या चित्रपटातील लोकप्रिय 'जय हो' गाण्याचे संगीत ऐकू आले. त्यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी खासदार राहुल शेवाळे, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, हंगेरी देशाचे कौन्सिल जनरल फ्रेंक जारी उपस्थित होते.



### असा आहे प्रयोग

भारतातील हा पहिलावहिला संगीतमय रस्ता आहे. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना मरीन ड्राइव्हवरील बोगदा संपल्यावर संगीतमय रस्त्याचा प्रारंभ होतो. वाहन ६० ते ७०च्या वेगात या संगीतमय पट्ट्यांवरून जाताच वाहनाच्या हालचालीमुळे गाणे ऐकू येणार आहे. महापालिकेने म्युझिकल रोडच्या ५०० मीटर, १०० मीटर आणि ६० मीटर अंतरावर या संदर्भात सूचना फलक लावले आहेत. यामुळे वाहनचालकांना मार्ग सुरू होण्यापूर्वी कल्पना मिळेल.

# पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**बीड : प्रतिनिधी**

खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगून आलेल्या एका तरुणाचा पोलीस भरतीदरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बीडमध्ये घडली आहे. मैदानी चाचणीत धावताना अचानक चक्कर येऊन कोसळलेल्या या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहेत.

बीड येथे सध्या पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी बुधवारी (दि. ११) मैदानी शारीरिक चाचणी सुरू असताना १६०० मीटर धावण्याच्या फेरीत परळी येथील दीपक भास्कर वावळ (वय २६) हा तरुण सहभागी झाला होता. धावत असताना अचानक त्याला अस्वस्थ वाटू लागले आणि तो चक्कर येऊन थेट मैदानावरच कोसळला. मैदानावर उपस्थित असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी आणि वैद्यकीय पथकाने क्षणाचाही विलंब न लावता दीपकला बीड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच त्याची प्रकृती खालावली होती. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# रायगड पोलीस दलात शिपाई पदासाठी भरती प्रक्रिया सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाच्या ९४, तर चालक पोलीस शिपाई पदाच्या तीन जागांसाठी भरती प्रक्रियेला बुधवार (दि.११)पासून सुरुवात झाली. पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर ही प्रक्रिया १६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. पहिल्या दिवशी बोलावण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात आली.

पहाटेपासूनच जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या परिसरात उमेदवारांनी रांगा लावल्या होत्या. पहिल्या दिवशी ८०० उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी बोलावण्यात आले होते. त्यापैकी ५४३ उमेदवारांनी प्रत्यक्षात हजेरी लावली. सुरुवातीला उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर शारीरिक मोजमाप घेण्यात आले. शारीरिक मोजमापात ४१ उमेदवार अपात्र ठरले. त्यानंतर उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. यात गोळाफेक, १०० मीटर धावणे आणि १६०० मीटर धावणे यांचा समावेश आहे. सर्व ५०२ उमेदवार मैदानी चाचणीत पात्र ठरले आहेत.

पोलीस भरती पारदर्शक आणि निपक्षपातीपणे व्हावी यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे. सर्वत्र सीसीटीव्ही लावण्यात आले असून प्रत्येक चाचणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जात आहे. या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान कुठलाही गैरप्रकार होऊ नये यासाठी ४२ पोलीस अधिकारी, ३२९ पोलीस अंमलदार व ३६ मंत्रालयीन कर्मचारी असे मनुष्यबळ तैनात करण्यात आलेले आहे.

# एसटी प्रवासाचा नवा डिजिटल युगारंभ

## सवलतधारकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस.टी. महामंडळाने 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून, प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत. यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे.

या प्रकल्पासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे.एस.टी. चा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. तिकीट हातात आणि सुट्ट्या पैशांची चिंता या जुन्या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. नव्या युगात, एका स्मार्ट कार्डच्या स्पर्शाने प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे, असे प्रतिपादन परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

### कोणाला मिळणार एनसीएमसी कार्ड?

*या नव्या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थी : शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. ज्येष्ठ नागरिक व महिला : अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल. दिव्यांग प्रवासी : यूडीआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड, पुरस्कारार्थी व पत्रकार : स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारामार्फत वितरण होणार आहे.*

### कार्डची वैशिष्ट्ये : प्रवासात स्मार्ट सोय

*१) किंमत: नवीन कार्ड १९९ रुपये (जीएसटीसह). जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत उपलब्ध. २) वॉलेट मर्यादा: किमान १०० रुपये; ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज. ३) रिचार्ज सुविधा : ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल प किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज. ४) नोंदणीसाठी व्यापक यंत्रणा : ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३०००हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. ५) बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.*

# नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप येथील ड्रेनेज लाइन दुरूस्त करण्याची मागणी

## नगरसेवक भुजबळांचे आयुक्तांना पत्र

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप येथील जीर्ण झालेली पाणीपुरवठा पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकावी आणि अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असलेली ड्रेनेज लाइन दुरुस्त करण्याची मागणी नगरसेवक मनोज भुजबळ यांची आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत मनोज भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप परिसरातील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईन ही अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असून अनेक ठिकाणी तुटलेली व चोकअप झालेली आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असून दुर्गंधी व विविध आजार पसरत आहे. या समस्येमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे.

पावसाळ्याच्या काळात परिस्थिती अधिकच गंभीर होते व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.तरी सदर सेक्टर १३ ए टाईप येते येथील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईनची तातडीने पाहणी करून, ती योग्य पद्धतीने दुरुस्त करून चांगल्या दर्जाची नवीन लाईन टाकून देण्यात यावी तसेच या परिसरात असलेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन ही अत्यंत जीर्ण व जुनी झालेली आहे. सदर पाईपलाईनमधून वारंवार गळती होत त्यामुळे बाहेरील गटाराचे व पावसाचे खराब पाणी त्या पाईप मधून पिण्याच्या पाण्यात मिसळते व त्यामुळे नागरिक वारंवार विविध आजारांनी ग्रस्त होतात पाईप आणि लिकेज मुळे पाण्याच्या दाबामध्ये (प्रेशरमध्ये) मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, यामुळे परिसरातील नागरिकांना अत्यल्प प्रमाणात पाणी मिळत असून अनेक घरांपर्यंत पाणी वेळेवर व पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही, याबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही.

जीर्ण झालेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तातडीने काढून त्या ठिकाणी नवीन व क्षमतेची पाईपलाईन टाकून देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.



**उरण : भारतीय जनसंघाचे अध्यक्ष पं. दीनदयाळ उपाध्याय यांची ५८वी पुण्यतिथी उरण भाजप संपर्क कार्यायात बुधवारी झाली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील पाटील, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, नगर परिषदेतील गटनेते जयविन कोळी निखिल माळी, भाजप कार्यकर्ते शुभम सूर्यवंशी आदी उपस्थित होते. सर्वांनी अभिवादन केले.**

# कर्जतमध्ये पोलिसांच्या तत्परतेने वाचले तरुणाचे प्राण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील पोलीस मैदानासमोर असलेल्या एका आठ मजली इमारतीवरून २३ वर्षीय तरुणाने उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. मात्र पोलिसांच्या साहसी आणि तत्परतेने केलेल्या प्रयत्नांमुळे या तरुणाचे प्राण वाचले असून मोठा अनर्थ टळला आहे.



बसुराज निर्वाने वय - २३ सध्या राहणार पुलाची वाडी, महिनाभरापूर्वी त्याचे दक्षिण भारतातील मूळची आणि सध्या कर्जतच्या दहिवली परिसरात वास्तव्यास असलेल्या एका तरुणीसोबत कोर्ट मॅरेज झाले होते. प्रेमविवाह करून संबंधित तरुणीने घरच्यांच्या विरोधात लग्न केले होते. मात्र लग्नानंतर १५ ते २० दिवस सासरी राहिल्यानंतर ती तरुणी माहेरी परत गेली. त्यानंतर तिने सासरी परत येण्यास नकार दिल्याचे समजते. या कारणामुळे मानसिक तणावात असलेल्या बसुराज निर्वाने याने पोलीस ठाण्यासमोरील सुरू असलेल्या एका आठ मजली इमारतीवर चढून उडी मारण्याचा प्रयत्न केला.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. शांतपणे समजूत काढत तरुणाला सुरक्षितपणे खाली उतरवले.

# मुरूड नगरपरिषदेमार्फत अतिक्रमण दूर

## मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांची धडक कारवाई

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव हे कर्तव्यदक्ष अधिकारी असून मुरुड शहरातील अतिक्रमणे दूर करण्यासाठी ते नेहमी धाडसी कृती करीत असतात. मुरुड शहराचे सौंदर्य अबाधित रहावे स्वच्छ सुंदर शहर राहण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात. मुरुड शहरातील रस्ते व त्यावरील होणारी अतिक्रमण दूर होण्यासाठी धाडसी पावले उचलणारे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्याकडे पहिले जाते.



आतापर्यंत त्यांनी मोठ मोठी हॉटेलसुद्धा जमीनदस्त केली आहेत.

मुरुड नगरपरिषद मार्फत मंगळवारी सायंकाळ दरम्यान रस्त्यावरील अतिक्रमणे दूर करण्याची मोहीम जोरदार राबवण्यात आली.यावेळी एक जेसीबी व तोडपथक यांच्यासहित सर्व कर्मचारी व अधिकारी वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होता.मुरुड समुद्र किनारी व्यवसाय करणाऱ्या अनेक टपऱ्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे वाहतुकीस त्रास होतो या कारणास्तव दोन टपरी धारकांच्या टपऱ्या दूर करण्यात आल्या आहेत.

तद्नंतर मच्छीमार्केत जवळील एका घराचे बांधकाम रस्त्यावर आले होते.तोड पथकाने लावलेली सर्व कुंड्या सहित झाडे, गटारावरील पायऱ्या अन्य बाबी हलवण्यात येऊन रस्ता मोकळा करण्यात आला आहे.बाजारपेठ येथील हॉटेल च्या पायऱ्या सुद्धा तोडण्यात येऊन रस्ता खुला होण्यास मदत झाली आहे.बाजारपेठ येथील भाजी विक्रेते हे रस्त्यावर टेबल लावून भाजी विकत होते रस्त्यावरील सर्व टेबल हटवण्यात आली आहेत. सर्व अतिक्रमण हटविताना मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. मुरुड नगरपरिषद अतिक्रमण हटवण्याचा या पथकामध्ये मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे, शहर अभियंता अनिकेत वाजे, नगर रचना सहायक अनिकेत भोसले यांच्यासह अनेक कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# लेक शिकवा अभियानांतर्गत नवघर शाळेत हळदीकुंकू

**पाली : प्रतिनिधी**

नवघर शाळेमध्ये 'लेक शिकवा' अभियानांतर्गत हळदी-कुंकू कार्यक्रमाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळा परिसरात उत्साहाचे आणि प्रबोधनाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे माता-पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेली रांगोळी स्पर्धा. स्त्री शिक्षणाचा संदेश आणि सामाजिक विषयांवर आधारित सुंदर रांगोळ्यांनी शाळेचे अंगण सजले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत 'लेक वाचवा, लेक शिकवा' हा संदेश घराघरात पोहोचवला.



### बालविवाह रोखण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन

या प्रसंगी नवघर येथील ज्येष्ठ नागरिक जोशी काकू यांनी उपस्थित माता आणि मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम आणि मुलींचे योग्य संगोपन या विषयांवर प्रकाश टाकला. मुलींना शिक्षण देऊन स्वावलंबी बनवणे हीच काळाची गरज आहे, असे विचार त्यांनी मांडले.

परंपरेचा वारसा जपत शाळेतील सर्व महिला शिक्षिका आणि विद्यार्थिनींनी नटून-थटून या सोहळ्यात सहभाग घेतला. एकमेकींना हळदी-कुंकू लावून आणि वाण वाटून सण साजरा करण्यात आला. केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर मुलींच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी एकत्र येण्याचे प्रतीक म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले गेले.

कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन मुख्याध्यापक संगीता बैकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विषय शिक्षिका वृषाली गुरव, उपशिक्षक शितल पाटील, अनुजा माने आणि रुपाली मॅडम यांनी कार्यक्रमाची पूर्वतयारी आणि व्यवस्थापन चोख पार पाडले.

# विसपुते विद्या संकुलात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**कळंबोली : बातमीदार**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र राज्य आणि आदर्श शैक्षणिक समूह संचालित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने भावपूर्ण अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी पंडितजींच्या प्रतिमेचे श्रद्धापूर्वक पूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित ध्वनी-चित्रफीत सादर करून उपस्थितांना त्यांच्या विचारविश्वाची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सीमा कांबळे यांनी करत उपाध्यायजींच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व विशद केले.

पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक तथा आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन श्री. धनराज विसपुते यांनी मार्गदर्शन करताना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शन तत्त्वज्ञानावर सखोल प्रकाश टाकला व त्यांच्या कार्यातून समाजसेवेची नवी दिशा कशी मिळते, याबाबत मौलिक विचार मांडले.

उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व कार्यकर्त्यांच्या सहभागाने कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात झाला. पंडितजींच्या विचारांवर चालण्याचा संकल्प हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

पान १ वरुन

## मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पिल्लई विद्यापीठाचे उद्घाटन

डॉ.के.एम. वासुदेवन पिल्लई यांनी या वेळी विद्यापीठाच्या ध्येयधोरणांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, पिल्लई विद्यापीठ हे जागतिक शैक्षणिक सहकार्य आणि तंत्रज्ञान सक्षम शिक्षणावर भर देणार असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असे कौशल्यपूर्ण शिक्षण येथे दिले जाईल. तीन हजारपेक्षा अधिक लोकांना रोजगार देणारी ही संस्था आता उच्च शिक्षणात एक नवीन मानदंड प्रस्थापित करण्यासाठी सज्ज झाली आहे.

या सोहळ्याला माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, प्रियम पिल्लई, प्राचार्य एस.जोशी, डॉ. निवेदिता श्रेयस यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पनवेल आणि परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व बौद्धिक विकासाला मोठी गती मिळणार असून उच्च शिक्षणासाठी हे एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरेल, असा विश्वास सर्वच मान्यवरांनी या वेळी व्यक्त केला.

# नर्सिंग सीईटी परीक्षेची अंतिम मुदत २४ फेब्रुवारी

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण कुटुंबातील मुलामुलींना दर्जेदार व्यावसायिक शिक्षणाची संधी मिळावी, त्यांचे भविष्य सुरक्षित व्हावे आणि त्यांना देश-विदेशात सन्मानाची नोकरी मिळावी, या उदात्त ध्येयातून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती गीता तटकरे नर्सिंग कॉलेज आज शिक्षण क्षेत्रात आशेचा किरण ठरत आहे. शहरी भागापुरते मर्यादित असलेले नर्सिंग शिक्षण आता ग्रामीण विद्यार्थ्यांच्या दारी पोहोचले असून, हे कॉलेज खऱ्या अर्थाने ग्रामीण भागासाठी वरदान ठरत आहे.

या प्रतिष्ठित नर्सिंग महाविद्यालयात प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाची नर्सिंग सीईटी परीक्षा बंधनकारक असून, अर्ज भरण्याची अंतिम मुदत २४ फेब्रुवारी आहे. बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देऊन प्रवेश घेता येतो. विशेष म्हणजे मुलगे आणि मुली दोघांनाही समान संधी देण्यात येते.

चार वर्षांच्या या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञानच नव्हे तर सखोल प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाते. शिकत असतानाच नोकरीच्या सुवर्णसंधी उपलब्ध होतात. देशात आणि विदेशात प्रशिक्षित परिचारिकांना मोठी मागणी असल्यामुळे या कोर्सनंतर उज्ज्वल करिअरची हमी मिळते. अनेक विद्यार्थ्यांनी या संस्थेतून शिक्षण घेऊन उच्च पगाराच्या नोकऱ्या मिळवत आपल्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावला आहे.

सीईटी परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयात मोफत मार्गदर्शन व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ड. राजीव साबळे, चेअरमन डॉ. गौतम राऊत आणि प्राचार्या श्रीमती महेरोश सनगे यांनी केले आहे.

अंतिम तारीख २४ फेब्रुवारी आहे. संधी गमावू नका, असे आवाहन श्रीमती गीता तटकरे नर्सिंग कॉलेजने केले आहे.




**मुंबई : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आयोजित लॉ नेटवर्क फोरम कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार रमेश औताडे यांचा मान्यवरांच्या हस्ते स्त्कार करण्यात आला.**

**दुखवटा**

## बबीबाई म्हात्रे



**उरण :** न्हावा येथील माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांच्या मातोश्री बबीबाई दामोदर म्हात्रे (वय ९१) यांचे नुकतेच वृद्धापकाळामुळे निधन झाले. दिवंगत बबीबाई म्हात्रे यांनी गरिबीतून वाटचाल करीत कुटुंब सावरले. त्यांच्या मागे मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवारी (१२ फेब्रुवारी) न्हावा येथे राहत्या घरी होणार आहे.

# फेसबुकवरील मैत्री महागात; पोलिसाला १९ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

सायबर गुन्हेगाराने नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या पोलिसाला डिजिटल गोल्डमधील गुंतवणुकीच्या बहाण्याने तब्बल १८ लाख ९८ हजारांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात महिलेवर गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला ३४ वर्षीय पोलीस शिपाई कळंबोलीत राहण्यास असून तो नवी मुंबई पोलीस मुख्यालयात नेमणुकीस आहे. १ डिसेंबर २०२५ रोजी या पोलिसाला फेसबुकवर गौरी मुखर्जी नावाच्या महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट आली. मैत्री झाल्यानंतर तिने पोलिसाचा विश्वास संपादन केला. तसेच आपण कोलकाता येथे राहून डिजिटल गोल्डमध्ये गुंतवणूक करत असल्याचे सांगितले. अमेरिकेतील आपल्या काकांमार्फत या व्यवसायात गुंतवणूक केल्यास पैसे दुप्पट होतात, असे आमिष तिने या पोलिसाला दाखवले. सुरुवातीला या पोलिसाने टाळाटाळ केली; मात्र सदर महिलेने आपला फोन खराब झाल्याचे सांगून आईचा मोबाईल क्रमांक संपर्कासाठी दिला. त्यामुळे पोलिसाचा तिच्यावर विश्वास बसला. त्यानंतर त्याने गुंतवणुकीची तयारी दर्शवली. त्यानंतर या महिलेने या पोलिसाला एका लिंकद्वारे डीजीएम नावाच्या आयडीवर नोंदणी करण्यास सांगितले.

सुरुवातीला ४० हजार रुपये भरल्यानंतर पोलिसाला त्याच्या खात्यात ३० हजारांचा नफा झाल्याचे दिसू लागले. त्यानंतर अधिक नफ्याच्या आमिषाने या पोलिसाने वेळोवेळी आरटीजीएस द्वारे दोन लाख १० हजार रुपये आणि इतर रक्कम भरली. त्यानंतर त्याच्या खात्यात तब्बल ३७ लाख १८ हजार रुपये नफा झाल्याचे दिसत असल्याने पोलिसाने त्यातील २० लाख रुपये काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याला कधी विड्रॉल चार्जेस तर कधी जीएसटी आणि टॅक्स भरण्याच्या नावाखाली पुन्हा पैसे भरण्यास भाग पाडण्यात आले. अशा प्रकारे या पोलिसाने १८ डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ या दीड महिन्यांच्या कालावधीत तब्बल १८ लाख ९८ हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांवर जमा केले.

या पोलिसाने अधिक पैसे भरण्यास नकार दिला असता, आरोपी महिलेने पैसे भरल्याशिवाय मूळ रक्कम आणि परतावा मिळणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच या पोलिसाने प्रथम सायबर पोर्टलवर आणि त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कारागृहातील आरोपीचा उपचारादरम्यान मृत्यू

## नातेवाईकांचा शोध

**कळंबोली : बातमीदार**

तळोजा पोलीस ठाणे हद्दीत गुन्ह्यात अटक करण्यात आलेला आणि तळोजा केंद्रीय कारागृहात शिक्षा भोगत असलेला विजयकुमार मुजेश्वर मंडल (वय ५५) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे कारागृह प्रशासन आणि पोलिस यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजयकुमार मंडल हा मूळचा नेपाळ येथील रहिवासी असून सध्या तो नांगरी, ता. पनवेल, जि. रायगड येथे वास्तव्यास होता. त्याच्याविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्याला तळोजा कारागृहात ठेवण्यात आले होते.

दरम्यान, कारागृहात असताना त्याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला तातडीने उपचारासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

प्राथमिक वैद्यकीय अहवालात मृत्यूचे कारण 'Pulmonary Consolidation' असल्याचे नमूद करण्यात आले असून अंतिम वैद्यकीय अहवाल अद्याप प्रलंबित आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, मृत विजयकुमार मंडल याच्या नातेवाईकांचा शोध सुरू असून संबंधितांनी तात्काळ खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## निवडक

### खारघरमधून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** खारघर वसाहतीमधील स्वप्नपुर्ती सोसायटीमधून एक १९ वर्षीय तरुणी कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. काजल यादव वाघमारे असे या तरुणीचे नाव असून तिचे वय १९ वर्षे, उंची ४.२ फुट, रंग सावळा, केस मध्यम, नाक बसके, डोळे काळे, बांधा सळपातळ, चेहरा उभट, अंगात नेसुन सिल्व्हर रंगाचा फुल शर्ट, व निळसर रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली आहे. या तरुणीबाबत कोणास काही माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक शशिकांत पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : टेंभोडे गावातील भाजपचे कार्यकर्ते माजी सरपंच अशोक गडगे यांचे सुपुत्र महेंद्र गडगे व रुपाली महेंद्र गडगे यांच्या घरी श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, पनवेल शहर सरचिटणीस लीना पाटील, लक्ष्मण गडगे, सुभाष भोईर, संतोष भोईर, उपसरपंच ललिता भोईर, कामिनी भोईर, नगरसेविका ॲड. प्रतिभा भोईर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप महायुतीला मिळालेल्या विजयाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अनेकांनी अभिनंदन केले. गव्हाण विभागातील न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, किशोर घरत, चंद्रकांत पाटील, जॉर्ज मिनीजेस आदी उपस्थित होते.**

# भाजप देशातील सर्वात मोठा पक्ष -लोकनेते रामशेठ ठाकूर

## भाजप नेते रविशेठ पाटील यांचा वाढदिवस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्याच्या कामात कोणताही राग-लोभ नसतो आणि केवळ चांगले काम करण्याची प्रामाणिक इच्छा असते, असे रवीशेठ यांचे व्यक्तिमत्व आहे. भाजप हा देशातील सर्वात मोठा पक्ष असून आज पनवेल पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकला आहे, तसेच जिल्हा परिषदेची सूत्रेही आता आपल्याच हातात आहेत आणि या यशात रविशेठ पाटील यांचा मोलाचा वाटा आहे असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वहाळ येथे केले.

तसेच बंडखोर आणि विरोधकांवर निशाणा साधताना कडक शब्दांत टीका केली. वेळ आल्यावर ज्याची त्याला जागा दाखववावी लागते आणि ते काम आता आपल्याला करायचे आहे. ज्यांच्या हातात सगळी सूत्रे दिली होती, मात्र सर्व काही आपल्यालाच पाहिजे या हव्यासापोटी जे सोडून पळाले, त्यांच्या नशिबात आता धोंडाच आला आहे, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.



भाजप नेते रविशेठ पाटील यांचा वाढदिवस मंगळवारी वहाळ येथील साई मंदिरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून रवीशेठ पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, या सोहळ्याचे औचित्य साधून गव्हाण जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या निकिता खारकर, चाणजे जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या रिना घरत, गव्हाण पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्या जिज्ञासा कोळी, वहाळ पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य वितेश म्हात्रे आणि चाणजे पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य कैलास भोईर यांचा जाहीर सत्कार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, उत्तम कोळी, निलेश खारकर, किशोर पाटील, धिरज ओवळेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त मार्गदर्शन

## ◆ खारघर शहर मंडळकडून अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहर मंडलाच्या वतीने एकात्म मानववादाचे प्रणेते व अंत्योदयाचे विचारवंत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त खारघर भाजप जनसंपर्क कार्यालय, सेक्टर १३ येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रभाकर तिजारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

भाषणात त्यांनी सांगितले की, एकात्म मानववाद या विचारसरणीतून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मानव, समाज आणि राष्ट्र यांचा समतोल विकास मांडला. भौतिक प्रगतीसोबत नैतिक मूल्यांची सांगड घालणारा भारत हे त्यांचे स्वप्न होते आणि ते स्वप्न आजही कार्यकर्त्यांच्या कार्याला दिशा देत आहे. सरचिटणीस दीपक शिंदे यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त करताना समर्पण दिवसाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, समर्पण दिवस म्हणजे त्याग, सेवा, राष्ट्रनिष्ठा आणि अंत्योदय या मूल्यांचे स्मरण करून स्वतः लाही समाजासाठी समर्पित करण्याची प्रेरणा घेण्याचा दिवस आहे.

या कार्यक्रमास मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, महासचिव दीपक शिंदे, ॲड. नरेश ठाकूर, प्रभाकर तिजारे, नगरसेविका अनिता वासुदेव पाटील, नगरसेवक समीर कदम, नगरसेवक मधू पाटील, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, मा. जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरपूरिया, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, जुमा चक्रवर्ती, रजनी शर्मा, भागवत गायकवाड, विश्वनाथ इंडी. तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचा प्रसार व समाजसेवेची प्रेरणा घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेलमध्ये अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषद सदस्या कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, कामगार नेते रवी नाईक, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अंकुश पाटील, के.सी. पाटील, विश्वजित पाटील, यतीन पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी उपाध्याय यांच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या एकात्म मानवतावादाच्या तत्त्वज्ञानाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे प्रमुख नेते, विचारवंत व तत्त्वज्ञ होते. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक होते आणि पुढे भारतीय जनसंघाच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी मांडलेले 'एकात्म मानवतावाद' हे तत्त्वज्ञान त्यांच्या विचारसरणीचे केंद्रबिंदू मानले जाते. या तत्त्वज्ञानात भारतीय संस्कृतीवर आधारित सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा विचार मांडण्यात आला आहे.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा 'अंत्योदय' हा त्यांचा मुख्य विचार होता. १९६७ साली ते भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे विचार आणि कार्य आजही भारतीय जनता पक्षाच्या धोरणांमध्ये आणि कार्यपद्धतीत प्रतिबिंबित होताना दिसतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेची भावना यांसाठी ओळखले जातात.

# पनवेलमध्ये लोकसहभागातून शिवजयंती उत्सव

## महापौर नितीन पाटील यांनी दिल्या आयोजनाबाबत सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अधिकाधिक लोकसहभागातून व महानगरपालिकेच्या सहकार्यातून पनवेल शहरामध्ये १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे भव्य दिव्य आयोजन करावे अशा सूचना महापौर नितीन पाटील यांनी बुधवारी (दि.११) दिल्या.



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूक व नाट्यगृहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे घेण्यात आलेल्या नियोजन बैठकीत ते बोलत होते.

या वेळी उपमहापौर प्रमिला पाटील, नवनिर्वाचित महानगरपालिका सदस्य, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगराध्यक्ष संदिप पाटील, आयुक्त मंगेश चितळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने,मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, महापालिका अधिकारी व कर्मचारी, पोलीस विभागाचे प्रतिनीधी, विविध जयंती मंडळाचे प्रतिनिधी, विविध शाळांचे प्रतिनिधी, विविध शासकीय संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महापौर नितीन पाटील यांनी लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या. तसेच मिरवणूकीमध्ये मैदानी खेळांचा समावेश करणे, विविध गणेश मंडळांना मिरवणूकीचे स्वागत करणे, तसेच सहकार्य करण्याबाबत पत्र देण्याच्या सूचना दिल्या.

आयुक्त मंगेश चितळे यांनी शिवजयंती मिरवणूक सुरळित पार पाडण्यासाठी ट्राफिक पोलीस विभाग व पोलीस विभाग यांचे सहकार्य नेहमीच लाभत असल्याचे सांगून याशिवाय महापालिकेचा एक विशेष चित्ररथ यावर्षीच्या मिरवणूकीमध्ये असणार असल्याचे सांगितले.

यावर्षी महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. याचे नियोजन आजच्या बैठकित करण्यात आले. यानिमित्ताने लेझीम पथक, चित्ररथ यांची स्पर्धा होणार आहे. याचबरोबर मागील शिवजयंतीचा लेखाजोखा परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी सादर केला. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचा खर्च लोकसहभागातून व प्रायोजकांच्या मार्फत केला जाणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि ७.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयापासून मिरवणूकीची सुरूवात होईल. हुतात्मा स्मारक चौक, आदर्श लॉज, गावदेवी मंदिर, सावरकर चौक, मनपा मुख्यालय, सेवा योजन कार्यालय, मौलाना आझाद चौक मार्गे मिरवणूकीचा शेवट टपाल नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळा चौकामध्ये होईल. नंतर आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहात पोवाडा व शिव नाट्य सादर करण्यात येणार आहे.

# कळंबोलीत आनंदोत्सव रॅली आणि नगरसेवकांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपला पनवेल महापालिका निवडणुकीत मिळालेल यश वरीष्ठांनी दाखवलेला विश्वास, कार्यकर्त्यांची मेहनत आणि झालेल्या विकासकामांमुळे मिळाले आहे, असे प्रतिपादन भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील यांनी आनंदोत्सव रॅली आणि नगरसेवकांच्या सत्कार समारंभावेळी केले.

पनवेल महापालिका निवडणुकीत भाजप महायुतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली यश संपादन केले. यानंतर महापौरपदी नितीन पाटील आणि उपमहापौरपदी प्रमिला पाटील यांची बिनविरोध निवड झाली. यानिमित्त



कळंबोलीमध्ये आनंदोत्सव रॅली आणि नगरसेवकांच्या सत्कार समारंभ मंगळवारी आयोजीत करण्यात आला होता.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचीत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, रामदास शेवाळे,विजय खानावकर, रवींद्र भगत, शशिकांत शेळके, दशरथ म्हात्रे, मधु पाटील, ममता म्हात्रे, मनाली ठाकुर, अस्मिता घरत, शिवानी घरत, लिना म्हात्रे, प्रिती जार्ज, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रतिभा भोईर, सिमा भोईर, प्रियंका कांडपिळे, बायजा बारगजे, सरस्वती कथारा, विजयश्री पाटील, मोनिका महानवर, माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, अजित अडसुळे, संतोष पाटील, रमेश मुंडे, सुशिला शर्मा, माजी नगरसेविका सुशिला घरत आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# काँग्रेसवर नामुष्की

चंद्रपूर महापालिकेत सर्वाधिक जागा मिळूनही अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेस पक्षावर सत्ता गमावण्याची नामुष्की ओढवली तर भारतीय जनता पक्षाच्या रणनीतीला यश येऊन ठाकरे गटाच्या मदतीने भाजपने तेथे महापौरपद मिळवले! आपल्याच दोन गटांमधील वाद मिटवण्यात काँग्रेसचे नेते व्यग्र असताना चंद्रपूरच्या भाजप नेत्यांनी मात्र ठाकरे गटाशी यशस्वी वाटाघाटी केल्या. राज्यभरात या नव्या समीकरणामुळे चर्चा सुरू झाली असून ही घटना राज्याच्या राजकारणावर परिणाम करणारी ठरेल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी म्हटले आहे.

**निवडणुकीचा निकाल आल्यापासून चंद्रपूर महापालिकेत सुरू झालेल्या सत्तासंघर्षाचा अखेर नाट्यमय शेवट झाला आहे. ठाकरे गटाने साथ दिल्याने तेथे भारतीय जनता पक्षाचा महापौर झाला तर निवडणुकीत सर्वाधिक २७ जागा जिंकूनही महापौरपद मिळवण्याचे काँग्रेसचे मनसुबे धुळीला मिळाले. २४ नगरसेवकांचे संख्याबळ असताना भाजपनेते सुधीर मुनगंटीवार आणि आमदार किशोर जोरगेवार यांची रणनीती यशस्वी ठरली तर ३२ नगरसेवकांचे पाठबळ असतानाही आमदार विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील गटबाजीमुळे काँग्रेसवर पराभवाची नामुष्की ओढवली. महापौरपदासाठी आपल्याच गटाला उमेदवारी मिळावी म्हणून हे दोन्ही नेते अडून बसले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना हा वाद सोडवता न आल्याने दिल्लीपर्यंत जाऊन चर्चा करण्यात आली. या वादात ठाकरे गटाने काँग्रेसकडे महापौरपदाची मागणी केली. मात्र ती काँग्रेसने फेटाळली. त्यानंतर लगेचच ठाकरे गटाने भाजपला पाठिंबा जाहीर केला. भाजप व ठाकरे गट यांच्यात महापौरपद प्रत्येकी सव्वा-सव्वा वर्षे विभागले जाईल असा 'लेखी करार' करण्यात आला. महापौरपदी भाजपच्या संगीता खांडेकर एका मताच्या फरकाने विजयी झाल्या तर उपमहापौरपदी ठाकरे गटाला पाठिंबा देणारे अपक्ष नगरसेवक प्रशांत दानव विजयी झाल्याचे घोषित करण्यात आले. चंद्रपूरच्या विकासासाठी भाजपला पाठिंबा दिल्याचे ठाकरे गटाकडून सांगण्यात आले. आम्हाला ज्यांच्याकडून अपेक्षा होती त्यांनीच भाजपला पाठिंबा दिला. त्यामुळे काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला असे प्रतिपादन धानोरकर यांनी नंतर केले. वंचित बहुजन आघाडीने मतदान प्रक्रियेत भाग घेणे टाळले तर एमआयएम तटस्थ राहिला. भाजपला पाठिंब्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला गेला असे ठाकरे गटाचे प्रवक्ते सांगत असताना, काँग्रेसने आपल्या पक्षाला दोष देऊ नये. सर्वाधिक जागा जिंकूनही सत्ता टिकवता न आल्याची काँग्रेस पक्षाला लाज वाटली पाहिजे असे उद्गार ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी काढले आहेत. तर अंतर्गत गटबाजीचा फटका काँग्रेसला बसल्याचे मान्य करतानाच चंद्रपूरमधील घटना राज्याच्या राजकारणावर परिणाम करणारी ठरेल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता परभणी महापौर निवडणुकीत ठाकरे गट व काँग्रेस एकमेकांची साथ देतात की नाही याविषयी चर्चा सुरू झाली आहे. चंद्रपूरच्या नेमकी उलट परिस्थिती परभणीत आहे. परभणीत उबाठाला काँग्रेसच्या पाठिंब्याची गरज आहे. मात्र चंद्रपूरमधील घडामोडींनंतर परभणीत ठाकरे गटासोबत जायचे की नाही याचा निर्णय काँग्रेस पक्षाने संध्याकाळी उशीरापर्यंत घेतला नव्हता. परभणीत जनतेने ठाकरे गटाला कौल दिला आहे. आपण जनतेच्या विरोधात जाणार नाही अशी भूमिका भाजपच्या स्थानिक नेत्यांनी व्यक्त केली आहे. तर सत्तास्थापनेसाठी काँग्रेसच्या संपर्कात असल्याचे स्थानिक ठाकरे गटाकडून सांगितले गेले. एकंदर चंद्रपूर महापौर निवडणुकीने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे खरे.**

# गुरु तेगबहादूरजी : धर्मस्वातंत्र्य, सहिष्णुता, मानवतेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासात अशी काही महान व्यक्तिमत्त्वे उदयास आली आहेत की, ज्यांचे जीवन समाजासाठी प्रेरणादाई व मार्गदर्शक ठरते अशा महान विभूतींचे कार्य एखाद्या धर्माच्या चौकटीत न अडकता संपूर्ण मानवजातीसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत ठरले आहे. शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर जी, हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य, न्याय, करुणा, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्पण केले. त्यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असताना, त्यांचे सामाजिक सुधारक म्हणून असलेले कार्य आणि विचार आजही तितकेच सुसंगत आणि मार्गदर्शक आहेत. प्रत्यक्षात शीख धर्म असा एक धर्म आहे की या धर्माच्या धर्म गुरुनी दिलेल्या बलिदाना मुळे हिंदू धर्माचे रक्षण झाले आहे.




**गुरु तेगबहादूर जी : थोडक्यात जीवनपरिचय**

१ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे जन्मलेले गुरु तेगबहादूर जी हे सहावे शीख गुरु श्री गुरु हरगोबिंद साहेब यांचे ते तेजस्वी पुत्र होते. बालपणापासूनच त्यांच्या जीवनावर अध्यात्म, शौर्य आणि सेवाभावाचे संस्कार कोरले गेले. वेद-उपनिषदे, इस्लामी तसेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल चिंतनातून त्यांच्या विचारांना सर्वधर्मसमभाव आणि उदात्त मानवतावादाची दिव्य झळाळी प्राप्त झाली. गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक प्रभावी सामाजिक सुधारक होते. त्या काळात भारतीय समाज जातीय भेदभाव, धार्मिक अत्याचार, अंधश्रद्धा आणि राजकीय दडपशाहीने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाला सत्य, समानता आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला.

गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर मानवी स्वातंत्र्याचे सजग प्रहरी होते. त्यांनी सर्वधर्मसमभाव, समता आणि आत्मसन्मान या मूल्यांचा पुरस्कार केला.

त्यांच्या धर्मांतरास उघड विरोधानंतर इ.स. १६७५ साली दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेगबहादूर जी यांना अमानुष यातना देऊन त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. हे बलिदान कोणत्याही राजकीय सत्तेविरुद्ध नव्हते, तर विचारस्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले महान बलिदान होते. गुरु तेगबहादूर जी मानवतेचे अमर नायक बनले. म्हणूनच त्यांना हिंद की चादर असे गौरवाने संबोधले जाते.

गुरुजींनी केवळ शीख धर्मियांसाठी नव्हे, तर हिंदू धर्मीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान देण्याचा निर्णय घेतला. धर्मस्वातंत्र्य, मानवी सन्मान आणि सामाजिक न्यायासाठी दिलेले हे ऐतिहासिक बलिदान होते. त्यांच्या या बलिदानामुळे भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाला नवी दिशा मिळाली. त्यांचे पुत्र श्री गुरु गोबिंदसिंग जी यांनी पुढे खालसा पंथाची स्थापना करून अन्यायाविरुद्ध संघटित लढ्याचा मार्ग दाखवला.

**मानवाधिकारांचे आद्य पुरस्कर्ते**

आज आपण मानवाधिकारांची चर्चा करतो, पण गुरु तेगबहादूर जी यांनी १७ व्या शतकातच मानवी हक्कांचा पुरस्कार केला. धर्म मानण्याचा अधिकार, विचार करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार हे मूलभूत मानवी हक्क आहेत, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्यांचे बलिदान हे कोणत्याही एका धर्मासाठी नसून संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठी होते.

**जातीय भेदभावाविरुद्ध संघर्ष**

त्या काळातील भारतीय समाज जातिभेदाच्या खोल दरीत अडकलेला होता. जन्मावर आधारित उच्च-नीचतेच्या कठोर रेषांनी माणसामाणसांत भिंती उभ्या केल्या होत्या. सामाजिक प्रतिष्ठा, धार्मिक अधिकार आणि मानवी सन्मान हे काही मोजक्या वर्गांपुरते सीमित झाले होते. अस्पृश्यता, भेदभाव आणि अन्याय हे समाजजीवनाचे अंग बनले होते. अशा विषम आणि अन्यायी सामाजिक रचनेत मानवी समानतेचा विचार मांडणे हे क्रांतिकारक धैर्याचे लक्षण होते.

याच अंधाऱ्या काळात गुरु तेगबहादूर जी यांनी शीख परंपरेतील एक ओंकार या तत्त्वाचा आशय समाजजीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने ईश्वर एकच असून, त्याची निर्मिती असलेला प्रत्येक मानव समान आहे. जात, धर्म, वर्ण किंवा पंथ यांवर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेला त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. त्यांच्या बाणीतून माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता, आचरणातील नैतिकता आणि सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित होते. सामाजिक समतेचा हा संदेश केवळ उपदेशापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष आचरणातून व्यक्त झाला. गुरु तेगबहादूर जी यांनी जातिभेदाच्या जखमांवर करुणेचा लेप लावला आणि समाजाला समतेच्या दिशेने नेण्याचा मार्ग दाखवला. म्हणूनच त्यांचे कार्य केवळ धार्मिक नव्हते, तर मूलगामी सामाजिक सुधारणा घडवणारे होते. त्यांच्या विचारांनी पुढील पिढ्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.

**अंधश्रद्धा आणि कर्मकांडाला विरोध**

गुरु तेगबहादूर जी यांच्या बाणीत आत्मचिंतनाला विशेष महत्त्व आहे. मनुष्याने प्रथम स्वतःच्या अंतःकरणाचा शोध घ्यावा, इच्छांचे बंधन ओळखावे आणि विवेकाच्या प्रकाशात जीवन जगावे, असा त्यांचा आग्रह होता. वैराग्य म्हणजे संसारापासून पलायन नव्हे, तर संसारात राहूनही आसक्तीवर विजय मिळवणे, हे त्यांनी स्पष्ट केले. संयम, सहनशीलता आणि धैर्य ही खरी साधना असून, संकटांच्या काळातही मन स्थिर ठेवणारा मनुष्यच खरा भक्त आहे, असा त्यांचा संदेश आहे. त्यांच्या मते ईश्वरभक्ती ही केवळ शब्दांत, वेशात किंवा विधींमध्ये व्यक्त होत नाही; ती माणसाच्या आचरणात, व्यवहारात आणि सेवाभावात प्रतिबिंबित झाली पाहिजे. म्हणूनच गुरु तेगबहादूर जी यांची बाणी ही आत्मशुद्धीची आणि मानवी मूल्यांची अमूल्य देणगी ठरते. त्यांनी अंधश्रद्धा, ढोंगीपणा आणि निरर्थक कर्मकांडांवर कठोर टीका केली. त्यांच्या बाणीत आत्मचिंतन, वैराग्य, संयम आणि ईश्वरभक्तीवर भर दिला आहे.

ते म्हणतात तीर्थ फिरौ, अरु दान
करौ, अवरु न पूजा जाई।
अंतर की मलु न उतरै, ज्यों धोवै
घरु बाहि।।

त्यांचे म्हणणे होते की, खरी
भक्ती ही माणसाच्या आचरणात
दिसली पाहिजे, केवळ बाह्य
आडंबरात नव्हे.

काहे रे बन खोजन जाई।
सरब निवासि सदा अलिपतो,
तोही
संगि समाई।।

गुरु तेगबहादूर जी यांनी सत्य, करुणा, दया, संयम आणि निर्भयता या नैतिक मूल्यांचा समाजात प्रसार केला. त्यांनी सांगितले की, संकटाच्या काळातही जो मनुष्य विचलित होत नाही, तोच खरा ज्ञानी आहे. त्यांच्या बाणीतून मानसिक स्थैर्य आणि आत्मबळ यांचा संदेश मिळतो. आजचा समाजही विविध प्रकारच्या सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक संघर्षातून जात आहे. अशा वेळी गुरु तेगबहादूर जी यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. धार्मिक सहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि मानवतेचा सन्मान हे मूल्य आजही तितकेच आवश्यक आहेत. गुरु तेगबहादूर जी हे केवळ शीख धर्माचे गुरु नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांच्या ३५० व्या बलिदान दिनानिमित्त आपण त्यांच्या सामाजिक सुधारणा, मानवतावादी विचार आणि निर्भय बलिदानाचे स्मरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण समाजात न्याय, समता आणि सहिष्णुता प्रस्थापित करण्यासाठी कार्य केले पाहिजे. गुरु तेगबहादूर जी यांचे बलिदान हे इतिहासातील एक तेजस्वी दीपस्तंभ आहे, जो आजही मानवतेचा मार्ग उजळवत आहे.

**- प्रो. डॉ. दीपक मो. शिंदे**
केंद्रीय जन जाती विद्यापीठ,
विजयानगरम (विशाखापट्टणम )



## बदलते तंत्रज्ञान

# कारच्या डिकीत 'या' गोष्टी ठेवत असाल, तर सावधान!

आज कार अपघाताचे प्रमाण वाढल्याचे दिसुन येते. या कार अपघाताला अनेकदा आपणच जबाबदार ठरू शकतो. नवीन कार आली की, ती अगदी नीटनेटकी ठेवून तिची काळजी घेतली जाते. पण, जशी कार हळूहळू जुनी होते, तसे मग आपण गाडीत काहीही वस्तू ठेवू लागतो.



कारमध्ये अनेकदा काही ना काही गोष्टी ठेवायची सवय सगळ्यांनाच असते. पण, तुमची ही एक छोटीशीही चूक तुम्हाला महागात पडू शकते. त्यामुळे तुमच्या गाडीचे नुकसान होऊ शकते आणि गंभीर परिस्थितीही ओढवू शकते.

तसंच कारच्या डिकीमध्ये काही गोष्टी ठेवणे हानिकारक ठरू शकते. त्यामुळे कारमध्ये स्फोट होण्याचा धोका आहे. जर तुम्हीही या गोष्टी कारमध्ये ठेवत असाल, तर आजच काळजी घेणे आवश्यक आहे.

खालील गोष्टी कारच्या डिकीत ठेवणे पडेल महागात

**१. ज्वलनशील पदार्थ**

पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर, पेंट, थिनर आदी ज्वलनशील पदार्थ गाडीच्या आत ठेवल्याने आगीचा धोका असतो. उन्हाळ्यात कारच्या आतील तापमानात लक्षणीय वाढ होते आणि त्यामुळे डिकीत असलेल्या ज्वलनशील पदार्थांना आग लागू शकते.

**२. एरोसॉल कॅन**

एरोसॉल कॅन्समध्ये दबाव असतो. जर उन्हाळ्यात एरोसॉल गाडीत ठेवले, तर दाब वाढून ते कॅन्स फुटू शकतात.

**३. बॅटरी**

कारच्या बॅटरीमध्ये ॲसिड असते. बॅटरी लीक झाल्यास त्यातुन सांडलेल्या पाण्यामुळे कारला आतून गंज चढू शकतो. त्याशिवाय शॉर्टसर्किटचा धोकाही असतो.

**४. खाद्यपदार्थ**


उन्हाळ्यात कारच्या आतील तापमानात लक्षणीय वाढ होते. तापमानामुळे अन्नपदार्थ खराब होऊन दुर्गंधी येऊ लागते.

**५. इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स**

मोबाईल फोन, लॅपटॉप, कॅमेरा इत्यादी इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स कारमध्ये ठेवल्यास नुकसान होऊ शकते. उष्णतेमुळे त्यांच्या बॅटरी फुगू शकतात किंवा खराब होऊ शकतात.

# पेशवाईच्या काळातील नाना फडणवीस

कोकणातून साताऱ्यात आल्यावर १७१४ साली सातारच्या शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवेपदी नेमले. बाळाजी विश्वनाथांनी शाहू महाराजांकडे शब्द टाकून हरी भानू यांना फडणवीशी दिली, मात्र हरी भानू यांचे चार-पाच महिन्यात निधन झाले. त्यांच्यानंतर बाळाजी (बळवंत) यांच्याकडे फडणवीशी आली. ते दिल्लीच्या स्वारी असताना त्यांना दिल्लीत मारण्यात आले. त्यांच्यानंतर रामचंद्र फडणवीस झाले. त्यांचे १७२४ साली निधन झाले. त्यानंतर बाळाजी यांचे पुत्र जनार्दन यांच्याकडे फडणवीशी आली.



## निमित्त

नाना फडणवीसाचे भानू घराणे आणि पेशव्याचे भट घराणे यांचा संबंध अनेक वर्षांपासूनचा आणि पिढ्यांचा होता. बाणकोटच्या खाडी या दोन्ही घराण्यांशी संबंधित आहे. खाडीच्या उत्तरेस भट घराण्याचे श्रीवर्धन आणि दक्षिणेस भानू घराण्याचे वेळास.

जनार्दन फडणवीस आणि रखमाबाई यांच्यापोटी जन्मास आलेले बाळाजी जनार्दन म्हणजेच नाना फडणवीस होय. नाना फडणवीस यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ रोजी सातारा येथे झाला. अत्यंत हुशार तल्लखबुद्धीच्या नाना फडणवीसांना त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर १७५६ साली फडणवीशी मिळाली. ते नानासाहेब पेशव्यांबरोबर स्वारीवरही जाऊ लागले. १७५७ साली त्यांनी श्रीरंगपट्टणमच्या मोहिमेत भाग घेतला त्यानंतर पानिपतच्या मोहिमेत ते सदाशिवरावभाऊ आणि विश्वासरावांसह सहभागी झाले.

पानिपतच्या युद्धानंतर नानासाहेब पेशवे फार काळ जगले नाहीत. सहा महिन्यांतच त्यांचा २३ जून १७६१ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर थोरले माधवराव पेशव्यांनी वस्त्रे स्वीकारली. नाना फडणवीस आता माधवरावांबरोबर काम करू लागले.

पेशवे मोहिमेवर जाताना कारभाराची जबाबदारी, किल्लेकोट नानांच्या भरवशावर टाकून जात. पराक्रमापोटी ते मोहिमांमध्ये विजयी होत असले तरी त्याचे थोडे श्रेय नाना फडणवीसांनाही दिले पाहिज मोहिमांना लागणारा पैसा, दारूगोळा वेळेच्या वेळेस नाना पाठवत आणि राज्याची काळजी घेत म्हणूनच या मोहिमा पेशव्यांना निर्धोकपणे पार पाडता येत असे ते वासुदेवशास्त्री खऱ्यांनी लिहून ठेवले आहे.


फडणीशी म्हणजे बजेटची आखणी, हिशेब ठेवणे, ऑडिट आणि पेशव्यांच्या राजधानी जबाबदारी पाहणे हे काम नानांकडे आले तसेच मोहिमांच्या वेळेचीही व्यवस्था त्यांच्याकडे आली. देवधरांच्या या शब्दांमधून नानांच्या वाढत्या दबदब्याचा अंदाज येतो.

राघोबादादा आणि माधवराव यांच्यात बेदिली होतीच. माधवरावांनी राघोबादादांना शनिवारवाड्यात कैद करून ठेवले होते. त्यांच्यावर देखरेखीसाठी नाना फडणवीसांना नेमण्यात आले. २ एप्रिल १७६९ रोजी राघोबादादांनी शनिवारवाड्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता, मात्र नानांनी त्यांना पुन्हा पकडून बंदोबस्तात ठेवले.

माधवरावांचा १७७२ साली क्षयामुळे मृत्यू झाला. मृत्यूपर्यंत नाना फडणवीस आणि हरिपंत फडके त्यांच्याबरोबर होते. त्यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यानंतर मराठा साम्राज्यातील त्यांचे महत्त्वाचे स्थान उमगते.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चमकदार त्वचा अन् घनदाट केसांसाठी...

थंडीच्या दिवसांमध्ये बहुतेकांना कोरड्या त्वचेचा त्रास होतो. कोरडेपणामुळे त्वचेवर काळसरपणा येण्यासह पांढरे पॅच दिसू लागतात. अशा वेळी दिवसभर मॉइश्चरायझर लावूनही काही परिणाम दिसत नाही. यात केसांसंबंधित समस्यादेखील वाढताना दिसतात. विशेषत: रात्रीच्या वेळी तुम्ही त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी काही गोष्टी फॉलो केल्यास काही दिवसांतच त्वचा मुलायम, चमकदार होण्यास व केस घनदाट होण्यास मदत होऊ शकते. याविषयी त्वचारोगतज्ज्ञ डॉ. मानसी शिरोलीकर यांनी माहिती दिली आहे.



बेडरुममधील हवेत आवश्यक आर्द्रता टिकवण्यासाठी ह्युमिडिफायरचा वापर करा. याच्या वापराने तुमची त्वचा व केस कोरडे होण्यापासून प्रतिबंधित करता येते. रात्रीच्या स्कीनकेअर रूटीनचा भाग म्हणून सॉफ्ट, हायड्रेटिंग क्लीन्सर किंवा क्लीनिंग लोशनचा वापर करा. यामुळे त्वचेतील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी न करता चेहऱ्यावरील मेकअप आणि अशुद्ध घटक प्रभावीपणे काढू शकता.

त्वचा हायड्रेटिंग ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी हायलूरोनिक ॲसिड आणि सिरॅमाइड्स घटक असणाऱ्या स्कीन केअर प्रोडक्टचा वापर करा. यामुळे त्वचा निरोगी ठेवण्यासह मदत होते तसेच जास्त काळ त्वचेतील हायड्रेशन टिकून राहते. कोरड्या त्वचेसाठी तुम्ही शिया बटर आणि ओटमील असलेले स्कीन केअर प्रोडक्ट वापरू शकता.

अंघोळीनंतर आणि झोपण्यापूर्वी ओलसर त्वचेवर बॉडीलोशन लावायला विसरू नका. फक्त चेहराच नाही तर कोपर आणि गुडघे यांसारख्या जास्त कोरडेपणा जाणवणाऱ्या भागात लोशनचा वापर करा तसेच रात्रभर कॉटनचे हातमोजे आणि पायमोजे वापरा.

रात्री झोपण्यापूर्वी लिव्ह-इन कंडिशनरच्या मदतीने केसांचे कंडिशनिंग करा. असे केल्यास केसांना योग्य पोषण मिळते. शिवाय ते तुटण्यापासून रोखता येतात तसेच केस मुलायम आणि घनदाट होतात.

हिवाळ्यात गरम पाण्याने अंघोळ करताना बरे वाटते, परंतु यामुळे तुमच्या त्वचा आणि केसांमधील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे कोरडेपणा वाढतो. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि होणारी जळजळ रोखण्यासाठी कोमट पाण्याने अंघोळ करा. यातून त्वचा हायड्रेटेड राहील. झोपण्याआधी ओठांना हायड्रेटिंग लिप बाम लावा. स्कीनकेअर रुटीनदरम्यान ओठांकडे अनेकदा दुर्लक्ष होते.

# गंभीर आजारात दिलासा देणार पॅलिएटिव्ह केअर सेवा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने गाव पातळीवर गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना सर्वसमावेशक आणि सुलभ आरोग्य सेवा देण्यासाठी पॅलिएटिव्ह केअर सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र आणि आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये पॅलिएटिव्ह केअर सेवा सुरू होणार आहेत. जिल्हा रुग्णालयामध्ये किमान चार ते सहा बेड उपशामक काळजीसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. यामुळे गंभीर आजारांवरील उपचारांसाठी ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही.

कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, मज्जासंस्थेचे आजार, श्वसन विकार तसेच वृद्धापकाळातील संबंधित आजाराचे प्रमाण वाढत असून अनेक रुग्णांना दीर्घकालीन उपचार व सतत काळजीची गरज भासते. अशा रुग्णांना घरपोच सेवा व जीवनाच्या अंतिम टप्प्यात सन्मानपूर्वक काळजी मिळावी हा पॅलीएटिव्ह केअरचा मुख्य उद्देश आहे.



## जिल्हा रुग्णालयासह सर्व आरोग्य केंद्रांमध्ये राखीव बेड

शासन निर्णयानुसार पॅलिएटिव्ह केअर सेवा केवळ अंतिम अवस्थेपुरते मर्यादित न ठेवता आजाराचे निदान झाल्यापासून उपचाराच्या संपूर्ण कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्य, जिल्हा, तालुका, प्राथमिक व समुदाय स्तरावर सेवा निर्माण करणे, प्रशिक्षित व बहुविषयीक मनुष्यबळ तयार करणे, वेदनाशामक औषधांचा अखंड पुरवठा, जनजागृती, काळजी घेणा-यांना प्रशिक्षण व घरगुती सेवांना बळकटी देणे यावर भर दिला जाणार आहे.

या कार्यक्रमाचा सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे मॉर्फिनसारखी प्रभावी वेदनाशामक औषधे थेट प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करून देणे हा आहे. प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी आता प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ती औषधे लिहून देऊ शकणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना वेदना नियंत्रणासाठी जिल्हा रुग्णालयात धाव घ्यावी लागणार नाही.

पॅलिएटिव्ह केअर सेवा केवळ अंतिम अवस्थेपुरते मर्यादित न ठेवता आजाराचे निदान झाल्यापासून उपचाराच्या संपूर्ण कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे गंभीर आजारांवरील उपचारांसाठी ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. रुग्णांचा वेळ व प्रवासाचा खर्च वाचेल. वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे गंभीर आजाराने ग्रस्त रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी केले आहे.

**गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी पॅलीएटिव्ह केअर सेवा ही दिलासादायक ठरणारी आहे. यामुळे अशा रुग्णांना ग्रामीण स्तरावरदेखील वेळेत व योग्य उपचार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक स्तरावरल शासकीय रुग्णालयांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत.**
**–नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी,राजिप**

# मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर फुडमॉल येथे चोरी; प्रवासी महिलेचे सहा लाखांचे दागिने चोरीला

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

बस मधून प्रवास करणाऱ्या महिलेचे जवळपास ५ लाख ८० हजाराचे दागिने आणि रोख रक्कम वर चोरट्याने हात साफ केल्याची घटना मुंबई पुणे एक्सप्रेस वर फुडमॉल येथे घडली. कांजुरमार्ग मुंबई येथे राहणारी महिला मंगळवारी कर्नाटका राज्य परिवहन सेवेच्या बसने उडपी ते मुंबई असा प्रवास करत होती . प्रवासा दरम्यान बस सकाळी साडेआठच्या सुमारास खोपोली पोलीस ठाणे हद्दीत पुणे मुंबई एक्सप्रेस वे मुंबई लेनवरील फुडमॉल येथे थांबली. बस थांबल्याने महिला व सहप्रवासी हे स्वच्छतागृहात जाण्यासाठी बसचे खाली उतरल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्स मधील सोन्याचे दागिने तसेच बस मधील सहप्रवासी यांचे बॅगमधील रोख रक्कम असा माल चोरी करुन नेला. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे करीत आहे

# कर्जत–चौक रस्त्यावर अपघात : दोघे गंभीर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथून चौक कडे जाणाऱ्या एर्टिगा गाडीला समोरून येणाऱ्या एसटी गाडीने जोरदार धडक दिली. रस्त्याच्या मधोमध एसटीने इर्टिगा गाडीला धडक दिल्याने गाडीमधील दोघे गंभीर जखमी झाले आहेत. कर्जत पोलिस ठाण्यात एसटी गाडीचे चालक याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान सकाळी पावणे बारा चे सुमारास झालेल्या या अपघातामुळे कर्जत चौक रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

वांगणी ठाणे येथील रिंकू सिंग हे आपली इर्टिगा गाडी घेऊन चौक कडे चालले होते. वांगणी येथून कल्याण कर्जत रस्त्याने कर्जत आणि पुढे कर्जत चौक रस्त्याने जात होते. साधारण पावणे बारा वाजण्याच्या सुमारास कर्जत एसटी आगाराची पनवेल येथून कर्जत कडे येणारी ही एसटी गाडी समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करीत असताना ही एसटी गाडी इर्टिगा गाडीवर जाऊन आढळली. हा अपघात इतका भयानक होता की चालक व बाजूला असलेली व्यक्ती या दोघांना अडकलेल्या



स्थितीतून बाहेर काढून तात्काळ डिकसळ येथील रायगड हॉस्पिटल येथे उपचारासाठी हालवले आहे.

अपघातात जखमी झालेल्या दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. तर या अपघातास कारणीभूत ठरलेला एसटी चालकावर कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या अपघातामुळे कर्जत – चौक राज्यमार्ग रस्त्यावर साधारण एक तास वाहतूक कोंडी झाली होती.

## कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे –पोलीस अधीक्षक आँचल दलाल

**चौक :** रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत जे उमेदवार विजयी झाले, जे पराभूत झाले, त्यांनी रायगड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी केले आहे. कुणाच्या व्यक्तिगत, राजकीय भावना दुखावल्या जाणार नाहीत, सार्वजनिक ठिकाणी, व्यक्तिगत टीका टिपण्णी करण्यात येऊ नये, असेही आवाहन त्यांनी केले.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-02/ 26-27 / 7000038833 | Providing 12 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2026-27 | Rs. 42,53,819.04/- | 25.02.2026 up to 23:59 hrs. |
| 2 | e-Tender-03/ 26-27 / 7000038836 | Work of Providing 3 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2026-27 | Rs. 16,56,414.12/- | 25.02.2026 up to 23:59 hrs. |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७६/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | निवळी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.....अशुद्ध जलउदंचन केंद्र व जलशुद्धिकरण केंद्राच्या परिसरातील प्रकाश व्यवस्थेमध्ये दुरुस्ती व सुधारणा करणे. | ₹ ३९,४२,६८५.०० |
| २ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.....तळोजा फीडरच्या सेवा रस्त्याच्या कडेला असलेले, मोकळे भूखंड/जागा, आरक्षित भूखंड व सुविधा भूखंडामध्ये असलेले अतिक्रमण हटवणे . | ₹ १९,११,०१०.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा येथील निवासी वसाहतीच्या अंतर्गत रस्त्यावरील पथदिव्यांसह विविध ठिकाणी औद्योगिक एलईडी ग्लो साइन बोर्ड प्रदान करणे, उभारणे व कार्यान्वित करणे. | ₹ ३२,१५,६८९.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची वार्षिक तत्वावर एका वर्षाच्या कालावधीसाठी सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती करणे आणि गंजलेले, खराब झालेले खांब, फिटिंग्ज, केबल्स बदलणे. | ₹ ४०,००,७४६.०० |
| ५ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील अलम टँकची दुरुस्तीसह मजबुतीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,५९,९७०.०० |
| ६ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती......सावळा रोड क्रॉसिंगजवळील खराब झालेल्या ६७५ मिमी व्यासाच्या मृदु पोलादी एचओसी ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी ३०० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीने व एसबीआय ते अशुद्ध जलउदंचन केंद्रापर्यंतच्या ३०० मि.मी. व्यासाच्या सीआय पीडब्ल्यू जलवाहिनी ८० मि.मी. व्यासाच्या जीआय जलवाहिनीने बदलणे. | ₹ २५,९८,५४४.०० |
| ७ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील सीएलएफ चॅनेल, फिल्टर गॅलरी व रीसायकलिंग टँक मधून गाळ काढणे. | ₹ ३२,२८,२३५.०० |
| ८ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... ... महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेच्या सांडपाणी वाहिनीचे चोकअप काढणे, साफसफाई करणे, चेंबरला मॅनहोल कव्हर पुरवणे आणि सांडपाणी संकलन वाहिनीमधून होणारी गळती दूर करणे ... (वार्षिक देखभालीचे काम) वर्ष २०२५-२६ | ₹ ३६,२९,५०४.०० |
| ९ | रानसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दूरूस्ती.... रानसाई जलशुद्धिकरण केंद्रात स्केल रिमूव्हर्स आणि अल्गासाइड वापरून वाळू फिल्टर्सची फिल्टरेबिलिटी सुधारणे रानसाई पाणीपुरवठा प्रकल्पातील जलरोधक संरचनांचे निर्जंतुकीकरण करणे. | ₹ ३९,७५,१४०.०० |
| १० | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील अशुद्ध व शुद्ध जलउदंचन केंद्रातील १५०/७५/५० अश्वशक्ती क्षमतेच्या पंपिंग मशिनरीच्या सुट्या भागांसह दुरुस्ती व ओव्हरहॉलिंग करणे. | ₹ ३९,४७,०१९.०० |
| ११ | महाड औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती...... महाड औद्योगिक क्षेत्रातील मऔवि महामंडळाचे कार्यालय व सामाईक सुविधा केंद्र इमारतीची वार्षिक तत्वावर सन २०२६-२७ करीता देखभाल व साफसफाई करणे. | ₹ १२,६२,४९६.०० |
| १२ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील ई-झोनमधील भूखंड क्रमांक ई-२७/१ ते ई-१८ पर्यंतच्या खराब झालेल्या एसी प्रेशर सांडपाणी वाहिन्या ३५५ मि.मी. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी वाहिनीने बदलणे. | ₹ ३९,९३,०३३.०० |
| १३ | महाड औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.... अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ ३९,८२,०७२.०० |
| १४ | पेण अलिबाग व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...जलउदंचन केंद्रावर सुरक्षा उपकरणे पुरवण्यासह अग्निसुरक्षा प्रणालीचे मजबुतीकरण करणे. | ₹ २८,८८,११७.०० |
| १५ | अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी साठवणुकीची क्षमता वाढवण्यासाठी, ५००० घनमीटर क्षमतेच्या सध्याच्या सांडपाणी संकलन टाकीला ३५५ मि.मी. व्यासाच्या एचडीपीई पाईपद्वारे आवश्यक उपकरणांसह १२०० घनमीटर क्षमतेच्या जुन्या सांडपाणी संकलन टाकीशी जोडणी करणे. | ₹ ३६,१२,७८०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १२/०२/२०२६ ते दिनांक २६/०२/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १६/०२/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १८/०२/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**ई-निविदा सूचना**

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२८/३३/२०२६ दिनांक :- ११/०२/२०२६

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय** (Central Government / State Government / Government under taking) **विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार फेर ई-निविदा** (2nd Call) **मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २५९/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क कामोठे येथील सेक्टर-१९, प्लॉट नं.१४ येथे शाळा बांधणे. (२nd Call) | ५७,६३,५७,६५३/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.१२/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त- I**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

ई-मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
वेबसाईट - panvelcorporation.com

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/S. Emerald Electronics Pvt. LTD, Kukreja Sapphire, Plot No. L-3, Road No.-5, Sector- KWC, Kalamboli, Tal.- Panvel, Dist.- Raigad. | ०२ पिंपळ, ०१ उबंर, ०१ सप्तपर्णी व ०१ निलगिरी अशी एकूण ०५ झाडे तोडणी. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Plot No. L-3, Road No.- 5, Sector- KWC, Kalamboli, Tal.- Panvel, Dist.- Raigad येथे ०५ झाडे हे वाहने ये - जा (आत बाहेर) करणेस, तसेच नवीन इमारतीचे बांधकामात बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडणी करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधीनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. २७/३२/२०२६**
**दिनांक :- ११/०२/२०२६**

**सही/-**
**उपायुक्त तथा अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# तारण ठेवलेले दीड कोटींचे सोने पळवले

## निदर्शने केल्यानंतर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैराणे सेक्टर १९ बी येथील महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दोन भागीदारांनी २७ जणांनी तारण ठेवलेले ९८८ ग्रॅम सोने घेऊन दुकान बंद करून पळ काढला आहे. २७ जानेवारीपासून दुकान बंद असून त्याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी फिर्यादी करीत आहेत. यासाठी किमान पन्नास पेक्षा जास्त वेळा कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवले गेले. शेवटी आंदोलन केल्यावर पोलिसांना जाग आली आणि त्यांनी या प्रकरणी महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दोन भागीदारांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

रुपेश गुज्जर आणि सुरेश या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या दोघांनी भागीदाराची कोपरखैरणे सेक्टर १९ बी येथील रांजना देवी प्रसन्न इमारतीत गेला क्रमांक तीन येथे महालक्ष्मी ज्वेलर्स नावाचे दुकान त्यांनी १५ वर्षांपूर्वी सुरू केले होते. या ठिकाणी त्यांची अनेक वर्षांपासून ओळख असलेले गुलचंद चौहान यांनी २५ सप्टेंबरला दागिने गहाण ठेवत ८ लाख रुपयांचे कर्ज घेतले. त्या पैकी चार लाख रुपये ३० ऑक्टोबर पर्यंत फेडण्यात आले. जेवढे पैसे फेडले तेवढ्या किमतीचे दागिने परत मागितले असता त्यांनी टाळाटाळ सुरु केली. ३ फेब्रुवारी पासून दुकानात फेऱ्या मारणे सुरु झाले मात्र दुकान कायम बंद होते. त्यावेळी परिसरात विचारणा केली




असता २२ जानेवारी पासून दुकान उघडले गेले नसल्याचे समोर आले असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ही माहिती हळूहळू अनेकांना कळली. अशा सुमारे तीस जणांनी तीन ते चार तारखेपासून महालक्ष्मी ज्वेलर्स विरोधात तक्रारी करणे सुरू केले, मात्र त्यांच्या विरोधात कोपरखैरणे पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ करणे सुरू केले. दबाव वाढल्यावर पोलिसांनी अगोदर अर्ज करा असे फर्मान सोडले त्यामुळे या बाबत चार तारखेला काही फिर्यादींनी अर्ज दाखल केला. मात्र तरीही पोलिसांनी काहीही हालचाल न केल्याने कोपरखैरणे पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उमटले गेले.

या प्रकरणी शनिवारी ७ तारखेला पोलीस उपायुक्त पंकज डहाने यांच्या पर्यंत हे प्रकरण पोहचले त्यांनी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. तरीही कोपरखैरणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. शेवटी रविवारी ३० पेक्षा अधिक लोकांनी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन केले. तसेच सोमवार पर्यंत गुन्हा दाखल केला नाही तर अधिक उग्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा देण्यात आला. त्यानंतर पोलीस खैरणे पोलिसांना जग आली आणि त्यांनी एकूण २७ जणांच्या फसवणूक प्रकरणी रूपेश गुज्जर आणि सुरेश यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी मोरे या फिर्यादी साक्षीदाराने दिलेल्या माहिती नुसार त्याच्या पत्नीचे मंगळसूत्र गहाण ठेऊन ३७ हजाराचे सोने तारण कर्ज घेतले त्यातील २७ हजार फेडण्यात आले. मात्र उर्वरित रक्कम देऊन सोने सोडवण्यास गेला असता सोनार पळून गेल्याचे समजले. आताचा बाजार भावानुसार ते मंगळसूत्र अडीच लाखांचे असल्याचे त्यांनी सांगितले.

### सोन्याचा वाढत्या दराने बिघडली नियत

सोने गहाण ठेवताना सोन्याच्या किमतीच्या ९० टक्के पर्यंत कर्ज दिले जात होते, मात्र गेल्या काही महिन्यापासून सोन्याचे भाव दीड पटींनी वाढले त्यात अनेक ग्राहकांनी बहुतांश पैसे फेडले असल्याने वाढत्या सोन्याच्या दरानुसार सोने परत देण्यापेक्षा फसवणुकीत जात नफा पाहून सोनाराने हे कृत्य केल्याचा दावा अनेकांनी केला. पोलीस दफ्तरी सोने जेव्हा विकत घेतले तो दर पकडला जात असल्याने हि रक्कम एक कोटी ४४ लाख झाली मात्र बाजार भावानुसार किमान ६ ते सात कोटी रुपयांचे सोने घेऊन संशयित आरोपी फरार झाल्याचा दावा अनेक तक्रारदारांनी केला आहे.

# सर्पमित्रांना विमा संरक्षण देण्याची मागणी

**खारघर : प्रतिनिधी**

शहरी व ग्रामीण भागात साप पकडण्याची जबाबदारी सर्पमित्रांवर असते. जीव धोक्यात घालून नागरिकांना मदत करणाऱ्या सर्पमित्रांना अद्याप कोणतेही विमा संरक्षण मिळालेले नाही. त्यामुळे अपघात, सर्पदंश किंवा मृत्यू झाल्यास कुटुंबीय असुरक्षित राहतात.

सर्पमित्रांना हे जोखमीचे काम करताना कोणत्या धोक्यांना सामोरे जावे लागते, मात्र नजीकच्या काळात बोगस आणि रिल्स स्टार सर्पमित्र वाढले आहेत. त्याचाच परिणाम प्रामाणिक आणि प्रशिक्षित सर्पमित्रांवर झालेला दिसून येत आहे. सर्पमित्रांना पूर्वी वनविभागाकडून १० लाखांचे विमा संरक्षण दिले जात होते, मात्र मोठ्या प्रमाणात वाढलेल्या सर्पमित्रांच्या सुळसुळाटामुळे पूर्णपणे विना बंद करण्यात आल्याने प्रामाणिक सर्पमित्रांना जीवावर उदार होऊन साप पकडावे लागत आहेत.

पनवेल तालुक्यात ३० पेक्षा जास्त सर्पमित्र कार्यरत आहेत, मात्र वनविभागाशी संलग्न असलेले ७ ते ८ सर्पमित्र



पनवेल मध्ये आहेत. सर्पमित्रांना विमा संरक्षण नाहीच! – वनविभागाकडून सर्पमित्रांना कोणतेही विना संरक्षण नाही. मोठ्या प्रमाणात वाढलेल्या सर्पमित्रांमुळे विमा वनविभागाने थांबविले आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे जोखिमेचे काम करणाऱ्या या सर्पमित्रांना खासगी असो वा सरकारी विमा कंपन्या विमा काढून देत नाहीत. त्यामुळे विषाची परीक्षा घेणारे सर्पमित्रांना यातना कठीण आहेत अशीच परिस्थिती आहे.

कोणतेही वन्यजीव असो व साप त्यांचे चित्रीकरण करण, त्याला हाताळण्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर टाकून स्टंटबाजी करणारे सर्पमित्र वाढले आहेत.वन्यजीव कायद्यात बंदी असताना देखील असे सर्पमित्र सोशल मीडियावर आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी स्टंट करीत असल्याने असे रिल्स स्टार सर्पमित्र नजीकच्या काळात वाढले आहेत.

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात साप आपला नैसर्गिक अधिवास सोडून बाहेर पडत असतात.विशेष म्हणजे वाढत्या शहरीकरणामुळे डोंगर परिसरात असलेल्या वसाहतीत मोठ्या प्रमाणात साप दिसून येत आहेत.

> **मागील १८ वर्षांपासून मी सर्पमित्र म्हणून कार्यरत आहेत. काही उत्साही स्वयंघोषित सर्पमित्र सर्रास साप पकडून सोशल मीडियावर प्रदर्शन करतात. अनेक बोगस सर्पमित्रांना वनविभागाने पकडून त्यांच्यावर कारवाई केली. याचा फटका प्रामाणिक सर्पमित्रांना बसला. शासनाने सरसकट सर्वांचे विमा संरक्षण बंद केले. शासनाने वनविभागाकडे नोंद असलेल्या सर्पमित्रांना विमा संरक्षण द्यावे.**
>
> **–रघुनाथ जाधव, अध्यक्ष,** स्नेक अवेअरनेस असोसिएशन

# तुर्भे विभाग अंतर्गत अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभाग अंतर्गत घर क्र. ५१८, सेक्टर – ५, सानपाडागांव, सानपाडा, नवी मुंबई, यांनी वरील नमुद पत्यावर प्रतयक्ष ठिकाणी स्थळपाहणी केली असता विनापरवानगी अनधिकृतरित्या ९.४० मी. X ५.० मी. मोजमापाच्या क्षेत्रफळामध्ये चौथ्या मजल्याचे आर.सी.सी. स्वरुपाचे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती, परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरूच होते. त्याअनुषंगाने, अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करून सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेलेआहे.

तसेच या मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षकदेखील तैनात ठेवण्यात आले होते. वरील अनधिकृत बांधकाम हटविण्याकरीता चार इलेक्ट्रीक हॅमर, १० मजूर यांचा वापर करण्यात आला आहे.

# ‘हिंद दी चादर’ शहिदी समागमासाठी प्रशासन सज्ज

**खारघर : रामप्रहर वृत्त**

‘हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर’ यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर, सेक्टर २९ येथील ओवे मैदानावर आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक, पार्किंग आणि नागरिकांच्या सोयीसुविधांचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती तसेच सामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीस पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक) रवींद्र पवार, उपजिल्हाधिकारी रवींद्र राठोड, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अंशुमन श्रीवास्तव व रविंद्र इंगोले, प्र. माहिती उपसंचालक मनोज सानप, जेएनपीएचे वाहतूक अधिकारी यशवंत पाटील व नागेश आकोडे, तसेच तहसीलदार (सामान्य प्रशासन) गजानन धुमाळ आदी उपस्थित होते.

नाशिक, पुणे व मुंबईकडून जेएनपीएकडे जाणाऱ्या तसेच जेएनपीएकडून विविध ठिकाणी जाणाऱ्या कंटेनर वाहतुकीचे विशेष नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक रेल्वेने येण्याची शक्यता लक्षात घेता, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक ठेवू नये, यासाठी रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.



# माधव सिद्धेश्वरे यांना पुरस्कार



**उरण : बातमीदार**

बीएलओचे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उरण नगर परिषदेचे कर्मचारी माधव काशिनाथ सिद्धेश्वरे यांचा रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी सत्कार केला आहे.

माधव सिद्धेश्वरे हे मतदार यादीचे पुनरनिरीक्षण कामी बीएलओ म्हणून अतीशय जबाबदारीने गेले अनेक वर्षे काम करत आहेत. खऱ्या अर्थांने लोकशाही टिकली पाहीजे यासाठी उरण नगर परिषदेचे कर्मचारी माधव सिद्धेश्वरे यांनी आपले काम प्रामाणिकपणे शिस्तबद्ध पद्धतीने केल्याबद्दल म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे खजिनदार तथा कर्मचारी माधव सिद्धेश्वरे यांना रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. माधव सिद्धेश्वरे यांना म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या सर्व पदाधिकारी, कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार मिळाल्याने माधव सिद्धेश्वरे यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खान्देश मित्र मंडळ उरणतर्फे अजित पवार यांना श्रद्धांजली



**उरण :** शहरातील विमला तलाव गार्डनमध्ये खान्देश मित्र मंडळ उरणच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी खान्देश मित्र मंडळ उरणचे कार्याध्यक्ष सुनील चौधरी, उपाध्यक्ष कैलास भामरे, खजिनदार वामनराव राठोड, सल्लागार संजय पाटील, सभासद भरत पाटील, सभासद रविंद्र पाटील, लता सूर्यवंशी, दत्तू महाले सुनील झोपे, संदीप पाटील, भरत चव्हाण, दिनेश पाटील आदी सभासद उपस्थित होते.



**कळंबोली : स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप कळंबोली मंडळामध्ये अध्यक्ष अमर पाटील व उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.**

# खांदेवाले मच्छीमार संस्थेची महापूजा



**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाड्यातील खांदेवाले मच्छीमार संस्थेच्या वतीने मंगळवार (दि. १०) रोजी सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले. वर्षभर खोल समुद्रात जाऊन मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांचे रक्षण व्हावे, समुद्रात मुबलक मासेमारी व्हावी आणि नाखवाची नौका सुखरूप बंदरात परतावी, या भावनेतून पारंपरिक पद्धतीने बंदर किनारी, जिथे होड्या नागरून ठेवतात त्या ठिकाणी पूजा मांडून देवापुढे मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

समुद्राइतकी अथांग मने, वाऱ्यासारखी झुंज देणारी वृत्ती आणि परंपरेशी नाळ जपणारी संस्कृती सन २००९पासून कार्यरत असून या संस्थेचे हे १६वे वर्ष आहे. विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांत संस्था सक्रिय सहभाग घेत आहे. वर्षातून एकदा दिवाळे कोळीवाड्यातील कोळी बांधव सर्व भेदभाव विसरून एकत्र येत या पूजेत सहभागी होतात.

विशेष म्हणजे, या सोहळ्यासाठी पारंपरिक वेशभूषेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. उपस्थित नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमावेळी भगवान सत्यनारायणाचे कथा पठण, श्री सद्गुरु वामन बाबा प्रासादिक भजन मंडळ तसेच छाया कला सर्कल ब्रास बॅण्ड पथकाने सादर केलेल्या भक्तिमय गीतांनी परिसर भक्तिरसात न्हाऊन गेला होता. तसेच महिलासाठी हळदी–कुंकू समारंभ आयोजित करण्यात आले होते.

या वेळी माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, खांदेवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष रमेश हिंडे, फगवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष अनंता बोस, डोलकर मच्छीमार संस्थेचे भालचंद्र कोळी, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, नगरसेविका भारती कोळी, अमित पाटील, परशुराम पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील मान्यवर आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञान, संस्कृती व भारतीय मूल्ये रुजवणारी शाळा म्हणजे विश्वशांती गुरुकुल -पद्मश्री परशुराम गंगावणे

## विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचे उद्घाटन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आजच्या आधुनिकतेच्या काळात भारतीय ज्ञान–परंपरा व आधुनिक शिक्षणाची सांगड घालणारी आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कृती व भारतीय मूल्ये रुजवणारी शाळा म्हणजे एमआयटी विश्वशांती गुरुकुल, असे विचार पद्मश्री परशुराम गंगावणे यांनी बुधवारी (दि. ११) मांडले. उलवेतील एमआयटी विश्वशांती गुरूकुल स्कूलमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड आणि उषा कराड यांच्या आशीर्वादाने प्रमुख पाहुणे पद्मश्री परशुराम गंगावणे आणि माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड



चाटे यांच्या हस्ते हा उद्घाटन सोहळा पार पडला. या सोहळ्यास एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या प्रकल्प संचालिका प्रा. प्रभा कासलीवाल, अण्णासाहेब टेकाळे, विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना, ॲकडेमिक हेड शीतल वर्मा, मार्केटिंग व ऑपरेशन्स हेड प्रा. के.सी. मिश्रा उपस्थित होते.

दरम्यान, माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे, विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना व ॲकडेमिक हेड शीतल वर्मा यांनी पत्रकारांशी संवाद साधून माहिती दिली. भारतातील अग्रगण्य शैक्षणिक समूहांपैकी एक अशा माईर्स एमआयटीची स्थापना विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी १९८३ साली केली. गेल्या चार दशकांहून अधिक काळ ही संस्था शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून संस्थेची देशभरात पाच विद्यापीठे आणि ७२हून अधिक शाळा व महाविद्यालये आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, डिझाइन, व्यवस्थापन अशा सर्व आस्थापनांमध्ये आणि नर्सरी ते पदव्युत्तर शिक्षणाचे पर्याय उपलब्ध असलेला शिक्षण समूह म्हणून जागतिक स्तरावर ओळखला जातो. शिक्षणाला राष्ट्रनिर्माण आणि विश्वशांतीचे प्रभावी साधन मानून संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडवणे हे या समूहाचे मुख्य ध्येय आहे. एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, उलवे माईर्स एमआयटी समूहाच्या याच दूरदृष्टीपूर्ण विचारसरणीचे प्रतिबिंब आहे, असे त्यांनी सांगितले.

# एकता महिला मंडळाचे कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील एकता महिला मंडळाच्या वतीने सरोजिनी नायडू यांची जयंती निमित्ताने संस्कृती रक्षक व समाजभान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम १३ फेब्रुवारीला दुपारी ४ वाजता काँग्रेस भवन येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मानसशास्त्रज्ञ डॉ. नीता ताटके उपस्थित राहणार आहेत. याशिवाय लाइफ लाईन हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. जयश्री पाटील अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य धरून होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये दादर येथील समर्थ व्यायाम मंदिरातील महिलांचे मल्लखांब प्रात्यक्षिक हे कार्यक्रमाचे आकर्षण असेल. समाज भान पुरस्कार २०२६ संगीता लाड यांना, तर संस्कृती रक्षक पुरस्कार २०२६ प्रचिती देसाई आणि ईशा देसाई यांना प्रदान करण्यात येणार आहे.

# श्रीवर्धन पं.स. सत्तासमितीचा ताळेबंद बदलला



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या निकालाने श्रीवर्धन तालुक्यातील स्थानिक राजकारणाची दिशा आणि दशा दोन्ही बदलून टाकली आहे. गेल्या काही वर्षांपासून ज्या सत्तासमीकरणावर पंचायत समितीचा कारभार चालत होता, त्याला मतदारांनी स्पष्टपणे छेद दिला असून नव्या राजकीय गणितांना जन्म दिला आहे.

हा निकाल केवळ विजय पराजयाचा नसून, आगामी काळात सत्ता कोणाच्या हातात राहणार, निर्णय प्रक्रिया कोण ठरवणार आणि सभापतीपदावर कोण विराजमान होणार, याबाबत अनेक प्रश्न निर्माण करणारा ठरला आहे. आधीची सत्ता आणि आजचे चित्र मागील कार्यकाळात श्रीवर्धन तालुक्यात पंचायत समितीवर शिवसेना (धनुष्यबाण चिन्ह) यांचे वर्चस्व होते. त्या वेळी पंचायत समितीमध्ये शिवसेनेचे तीन सदस्य, तर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक सदस्य निवडून आला होता. जिल्हा परिषदेतही एक राष्ट्रवादी आणि एक शिवसेना सदस्य असल्याने तालुक्याच्या सत्ताकेंद्रावर शिवसेनेचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे सभापतीपद, समित्यांचे नेतृत्व आणि प्रशासकीय निर्णय हे मुख्यतः शिवसेनेच्या ताब्यात होते, मात्र २०२६च्या निकालाने हे चित्र पूर्णतः बदलले आहे. आता जिल्हा परिषदेच्या दोन्ही जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य निवडून आले आहेत. पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन, भाजपचा एक आणि शिवसेना (शिंदे गट) चा एक सदस्य निवडून आल्याने सत्ता संतुलनाचे नवे गणित तयार झाले आहे.

स्पष्ट बहुमत कोणालाही नसले तरी, राजकीय पुढाकार मात्र राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेल्याचे दिसून येते. संधी सर्वांना, पण अटींसह सध्याच्या रचनेनुसार पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन आणि भाजपचा एक

## सभापती-उपसभापतीपदाचा पेच

***सध्या पंचायत समिती सभापतीपदासाठी मागासवर्ग आरक्षण लागू असल्याने किमान अडीच वर्षे उपसभापतीकडेच कारभाराची सूत्रे राहणार आहेत. ही बाब अत्यंत महत्त्वाची असून प्रत्यक्ष निर्णयक्षम सत्ता उपसभापतीकडे केंद्रित होणार आहे. त्यामुळे उपसभापती कोणत्या पक्षाचा असेल, यावरच विकासकामांची दिशा आणि निधीचे नियोजन अवलंबून राहील.***

सदस्य असल्याने थेट सत्ता एकाच पक्षाच्या हाती जाणे शक्य नाही. बहुमतासाठी आवश्यक संख्याबळ कोणाकडेही एकहाती नसल्यामुळे सत्तेची चावी समन्वय, आघाडी आणि परस्पर सहमतीवर अवलंबून राहणार आहे. याच कारणामुळे प्रत्येकाला एक-एक वर्ष संधी मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात नाकारता येत नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन सदस्य आणि भाजपचा एक सदस्य असल्याने, उपसभापतीपदावर राष्ट्रवादीचा दावा अधिक मजबूत मानला जात आहे, मात्र भाजपचा पाठिंबा निर्णायक ठरू शकतो. त्यामुळे ही सत्ता समर्थनाधारित राहील, असे स्पष्ट संकेत आहेत.

आगामी काळात जर सभापतीपदाचे आरक्षण रद्द झाले किंवा बदलले, तर खरा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्या वेळी सभापती राष्ट्रवादी काँग्रेसचा की भाजपचा, हा प्रश्न निर्णायक ठरणार आहे. जिल्हा परिषदेत दोन्ही सदस्य राष्ट्रवादीचे असल्याने नैतिक व राजकीय दबाव राष्ट्रवादीच्या बाजूने राहील, परंतु पंचायत समितीतील संख्याबळ पाहता भाजपही आपली भूमिका ठामपणे मांडू शकतो.

या निवडणूक निकालातून श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार मजबूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विकासकामांना मिळालेली ही मतदारांची पोचपावती असली, तरी पंचायत समितीतील सत्ता पूर्णतः एकहाती न राहता समन्वयावर चालणार आहे. त्यामुळे आगामी अडीच ते तीन वर्षे श्रीवर्धन तालुक्यातील राजकारण हे सौदेबाजी, समजूतदारपणा आणि कायद्याच्या चौकटीतील सत्तावाटप यावरच अवलंबून राहणार, हे निश्चित.

# आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून विजयी उमेदवारांचा जंगी सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील दोन जिल्हा परिषद सदस्य व तीन पंचायत समिती सदस्य निवडून आणून मुरूड तालुक्यात शिवसेना शिंदे गटाचे एकमार्गी बहूमत मिळाल्याबद्दल अलिबाग मुरूड विधान सभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी विजयी उमेदवारांचे जंगी सत्कार केले आहेत.

राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघातून सर्वाधिक व मोठ्या मताधिक्याने ४३६० मतांचा लीड घेऊन व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार अजित कासार यांचा अगदी सहज पराभव करून विजय प्राप्त करणारे विघ्नेश माळी यांचा सत्कार आमदार महेंद्र दळवी यांनी शाल, श्रीफळ व शाल देऊन करण्यात आला. या वेळी त्यांच्या विजयासाठी झटणारे व अथक परिश्रम घेणारे शिवसेनेचे मुरूड तालुका बांधकाम सेनेचे अध्यक्ष दिनेश मिणमीने यांचा सुधा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी कोर्लई जिल्हा परिषद मतदार संघातून निवडून आलेल्या ज्योती रमेश नागावकर यांचा तसेच पंचायत समिती सदस्य निलेश घाटवळ, गणेश नाकती, अश्विनी जंगम यांचासुद्धा सत्कार करण्यात आला.

या वेळी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी सर्व निवडून आलेल्या उमेदवारांचे अभिनंदन करून मुरूड तालुक्यात एकमार्गी शिवसेनेचे उमेदवार निवडून दिल्याबद्दल त्यांनी मुरूड तालुक्यातील जनतेचे विशेष ऋण व्यक्त केले. मी मुरूड तालुक्यात केलेल्या विकास कामांची जाण येथील जनतेने ठेवून मला जे भरभरून यश दिले त्याबद्दल मी जनतेचा ऋणी असून या पुढे सुधा विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही. निवडून आलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी जनतेच्या संपर्कात राहून जनतेच्या कामाला प्राधान्य द्यावे अशी सूचनासुद्धा या वेळी त्यांनी दिली जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य निवडून आण्यासाठी असंख्य शिवसैनिक यांनी घेतलेले कष्ट व मेहनत निश्चितच वाखण्याजोगी असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या वेळी जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी व त्यांना निवडून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे मुरूड तालुका शिवसेना बांधकाम अध्यक्ष दिनेश मिणमीने व त्यांचे सहकारी मजगावमधील शिवसेनेचे प्रमुख अमित कोळी, विकास पाटील, मिलिंद खेडेकर, निलेश तांबटकर दीपेश वरणकर, कॅप्टन आदित्य निकम आदी उपस्थित होते.



# जावळे येथे महाशिवरात्रीनिमित्त तीन दिवस धार्मिक-सांस्कृतिक महोत्सव

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील स्वयंभू श्रीक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या जावळे गावातील बेलेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीनिमित्त भव्य तीन दिवसीय धार्मिक-सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा भक्तिमय सोहळा शनिवार,१४ फेब्रुवारी २०२६ ते सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यंदा हे ३६ वे वर्ष असून विशेष म्हणजे गेल्या ३६ वर्षांपासून जावेळे सार्वजनिक महाशिवरात्री उत्सव मंडळ तर्फे या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते,

महोत्सवाची सुरुवात शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०.३० वाजता श्रीवर्धन येथील सुभाष अंजार्ले कर (भट्टीचामाळ) यांच्या शिवलीलामृत ग्रंथ वाचनाने होणार आहे. रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ (महाशिवरात्री) रोजी पहाटे सकाळी ५.०० वाजता काकड आरती होणार असून, सकाळी ७.३० वाजता स्वयंभू शंकराच्या प्रतीमेची संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक भक्तिमय वातावरणात काढण्यात येणार आहे

दुपारी १२.०० वाजता महाआरती श्रीवर्धनचे प्रख्यात व्यापारी कोठारी ब्रदर्स यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यानंतर दुपारी २.०० वा श्री धारेश्वर प्रासादिक भजन मंडळ, धारवली यांचे भजन (प्रमुख वक्ते - श्री. दत्ताराम सुर्वे),

दुपारी ४.०० वाजता जागृती महिला मंडळाच्या वतीने हळदी-कुंकू समारंभ, संध्याकाळी ६.०० वाजता आरती तसेच रात्री ९.३० वाजता शालेय मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता शालेय मुलांच्या क्रीडा स्पर्धा, त्यानंतर दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे आयोजन जावळे स्थानिक व मुंबई मंडळ, जावळे महिला मंडळ, नवरात्र उत्सव मंडळ व शिवशक्ती क्रिकेट मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, गावातील तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिक अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या भाविकांनी या पावन पर्वणीचा लाभ घेऊन भगवान स्वयंभू शिवशंकराचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# समृद्धी कोळींना लागणार सभापतीपदाची लॉटरी?

**नागोठणे : बातमीदार**

रोहा पंचायत समितीच्या नागोठणे गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभाग अध्यक्ष तथा पिगोंडे सरपंच संतोषभाई कोळी यांच्या सौभाग्यवती राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार समृद्धी कोळी (५२६७ मते) यांनी ठाकरे शिवसेनेच्या अंजली हिराजी दुर्गावले (४८२६ मते) यांचा ४४१ मतांनी पराभव करून विजय मिळविल्यानंतर नागोठणे जवळील पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वेलशेत आंबेघर या गावात फटाक्यांच्या अतिषबाजीत गुलालाची उधळण करीत असंख्य कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.



दरम्यान, रोहा पंचायत समिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आली असून सभापती पद महिलांसाठी राखीव आहे. रोहा पंचायत समिती मध्ये राष्ट्रवादीच्या समृद्धी संतोष कोळी व विजया विनोद पासलकर ह्या दोन महिला विजयी झाल्यामुळे खासदार सुनिल तटकरे सभापती पद दोघांनाही विभागून देतील अशी चर्चा असल्यामुळे समृद्धी कोळी यांना सभापती पदाची लॉटरी लागणार असल्याचे बोलले जात आहे.

समृद्धी कोळी यांच्या विजयानंतर सोमवारी (दि.९) सायंकाळी रोहा तालुक्यातील ज्ञानगंगा कोळी समाजाचे पदाधिकारी व सदस्य यांनी संतोषभाई कोळी व समृद्धी कोळी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन समाजाच्या वतीने शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. त्यावेळी अध्यक्ष राजेंद्र पोकळे, उपाध्यक्ष अशोक भोय, चंद्रकांत कोळी, रोशन पारंगे, दत्ता तरे, निकितेन पाटील, नथुराम पाटील, दत्ता चावरेकर, संतोष कोळी, विजय भोय आदी उपस्थित होते.

नागोठणे जिल्हा परिषद निवडणुकीत जिल्हा परिषदेचे शिंदे शिवसेनेचे उमेदवार सुमित काते यांच्या रूपाने वादळ निर्माण झाले होते या वादळात नागोठणे पंचायत समितीच्या उमेदवार समृद्धी कोळी चांगल्याच अडकल्या होत्या, परंतु वेलशेत आंबेघर ग्रामदैवत जखमातेच्या कृपेने समृद्धी कोळी या वादळातून बाहेर पडून विजयी झाल्याचा आनंद समृद्धी कोळी यांचे पती राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी यांनी व्यक्त केला.

# नांदगाव येथे महाशिवरात्र महोत्सव

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री गुरु सावर्डेकर महाराज संस्थापित रुद्ररेवा सेवा प्रतिष्ठान आळंदी देवाची अंतर्गत श्री गुरुमाता सेवाश्रम विनामूल्य वृद्धाश्रम अनाथाश्रम नांदगाव येथे १४ ते १७ फेबुवारी २०२६ या कालावधीत भव्य दिव्य महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन श्रीगुरू सावर्डेकर महाराजांच्या मार्गदर्शनाने विविध आध्यात्मिक संत महंत व राजकीय सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या उपास्थितीत श्री गुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे होणार आहे. श्री सिद्धिविनायक मंदिर,नांदगाव येथे सेवाश्रम परिवारातील मान्यवरांच्या हस्ते पत्रिका पूजनाने महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ करण्यात आला आहे.

महाशिवरात्र महोत्सवात आगमोक्त यज्ञ, शिवपूजन, भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान असे धार्मिक कार्यक्रम होतील. १५ फेब्रुवारी २०२६ महाशिवरात्र या दिवशी सकाळी १० वाजता श्री गुरुमाता सेवाश्रम येथून भव्य दिव्य पालखी सोहळा श्री अमृतेश्वर मंदिर येथे जाईल.

या महोत्सवात दिलीप महाराज ठाकूर, अंकेश महाराज पाटील, संजय बाळकृष्ण ठाकूर या मान्यवरांची प्रवचने व्याख्याने व अनंत महाराज मेंदाडकर सर दिघी, श्रीगुरू बाबा महाराज ढवळीकर पंढरपूर,मदन महाराज नेवरेकर जीवना, व श्रीगुरु माऊली महाराज सावर्डेकर आळंदी देवाची यांची कीर्तन होतील १६ फेब्रुवारी २०२६ या दिवशी सायंकाळी ५ वा भव्य मशाल महोत्सव व दिपोत्सव हे कार्यक्रम होतील.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी श्रीगुरू सावर्डेकर महाराजांच्या गोपाळ काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल.

सर्व शिवभक्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री गुरूमाता सेवाश्रम परिवार नांदगाव व श्रीगुरू सावर्डेकर महाराज शिष्य परिवार यांनी केलेले आहे.



# रोह्यात गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा उपासना केंद्रातर्फे श्री गजानन महाराज यांचा १४८ वा प्रकट दिन रविवार, ८ फेब्रुवारी रोजी अत्यन्त भक्तीपूर्ण वाटावारणात श्री ओंकारेश्वर मंदिरात साजरा करण्यात आला.



उत्सवाचे यंदाचे ५ वे वर्ष असून, रोह्यातील हे उपासना केंद्र ठाणे उपासना अंतर्गत हे केंद्र सुरू असून विजय गद्रे व ऋजुता गद्रे यांच्या विशेष पुढाकारातून हे केंद्र रोहे येथे सुरू झाले व ते गेली पाच वर्ष अव्याहतपणे सुरु आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी श्री ओंकारेश्वर मंदिरात ही उपासना होते.

श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकटदिनाच्या निमित्ताने रविवार, ८ फेब्रुवारी रोजी पारायण, जप,स्तोत्र पठण झाले व पसायदान व आरतीने या प्रकट दिनाची सांगता झाली. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रोहा येथील श्री ओंकारेश्वर मंदिरात उपासना होत असते तरी त्यामध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन उपासना रोहा केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

या उपासना केंद्राला ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे श्री ओंकारेश्वर मंदिर उपलब्ध करून देत असल्याची माहिती श्री. गद्रे यांनी दिली. ठाणे उपासना केंद्रात होणाऱ्या विविध आध्यत्मिक व सेवाभावी उपक्रमाँसाठीही रोहा उपासना केंद्रातुन भक्तगणांची उपस्थिती असते यामध्ये माघ वद्य सप्तमी ते ऋषी पंचमी पर्यंत होणारा गण गण गणांत बोते जप वहीत लिहिणे, डिसेंबर महिन्यात होणारी खामगाव ते शेगाव पदयात्रा, निवासी आध्यत्मिक शिबीर, जागतिक पारायण आदी उपक्रमाँचा समावेश आहे. उपक्रम यशस्वी होण्यासाठी उपासना केंद्रातील सर्व सदस्यांनी विशेष मेहेनत घेतली.

## बोर्ली येथे घरात घुसून मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

हुजरा मोहल्ला बोर्ली येथे शेजारील वादातून तिघांनी घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. फिर्यादीच्या मुलाने शेजारच्या मुलीला दिलेल्या इशाऱ्यावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ व मारहाण केली तसेच बाहेर पडताना दगडफेक करून फिर्यादी व त्यांच्या मुलास किरकोळ दुखापत केली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३३३. १२५ (ए), ११५ (२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल असून तपास सहायक फौजदार मिलिंद सुर्वे करीत आहेत.

# माणगावात शिवजयंतीनिमित्त महारक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था ता.माणगाव (रजि.) या संस्थेतर्फे सलग १० व्या वर्षी के.ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंती निमित्त शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महारक्तदान शिबिराचे आयोजन सरलादेवी मंगल कार्यालय हॉल, उपजिल्हा रुग्णालयाच्या पाठीमागे, सिद्धीनगर माणगाव याठिकाणी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. तरी रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था माणगाव यांच्यातर्फे करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

या शिबिरास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड.राजीव साबळे, जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माणगाव नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा रिया उभारे, केईएम रुग्णालयाचे समाज विकास अधिकारी डॉ.प्रकाश सावंत, माणगाव प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप, माणगाव तहसीलदार विपीन लोकरे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, माणगाव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, सामाजिक कार्यकर्ते संजयआप्पा ढवळे,सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, सामाजिक कार्यकर्ते बाबूशेठ खानविलकर, भुवन ग्रामपंचायतीचे सरपंच दिपक जाधव, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. प्रकाश ओक, राजिप सदस्य अस्लम राऊत, माणगाव वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुणा पोहरे, नगरसेवक प्रशांत साबळे, माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण, माजी उपनराध्यक्ष राजेश मेहता, माणगाव मेडिकोज अध्यक्ष डॉ.परेश उभारे, सामाजिक कार्यकर्ते रामनारायण मिश्रा, उद्योजक मंगेश पोळेकर, माणगाव वकील संघटना अध्यक्ष अँड. मोहन मेथा, सामाजिक कार्यकर्ते अल्ताफदादा धनसे, माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, सामाजिक कार्यकर्ते बशीर किरकिरे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शिबिरात रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू, प्रमाणपत्र, रक्तदान केल्याचे ओळखपत्र तसेच विशेष कॉलेज विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी उपयुक्त पडणारे सर्टिफिकेट के.ई.एम. रुग्णालय मुंबई यांच्यातर्फे देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सेवाभावीसंस्थेत सभागी असणारे माणगाव तालुका पत्रकार संघ, छावा प्रतिष्ठान रायगड, विवा कॉलेज माणगाव, चारिझेन फाउंडेशन माणगाव, एस.एस. निकम इंग्लिश स्कुलअँड ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगाव, माणगाव जनरल नर्सिंग कॉलेज, रोटरी क्लब ऑफ माणगाव, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा रायगड तालुका शाखा माणगाव,सुभाष दळवी मित्रमंडळ माणगाव, उपजिल्हा रुग्णालय माणगाव,टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव, अविष्कार फाऊंडेशन इंडिया रायगड ता. माणगाव, नवयुवक मित्र मंडळ खांदाड, व्यापारी असोसिएशन माणगाव, माणगाव नागरी सेवा समिती, नमस्कार मित्र मंडळ बोंडशेत ता.माणगाव, साई बोअरवेल माणगाव,सुषमा स्वराज महिला सेवाभावी संस्था माणगाव, उम्मते मुस्लीमा कमिटी माणगाव, संकल्प प्रतिष्ठान मोर्बा, लायन्स क्लब ऑफ माणगाव, द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव, श्रीमती गीता द.तटकरे नर्सिंग कॉलेज माणगाव, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय माणगाव, आराध्य प्रतिष्ठान माणगाव, मराठा कर्मचारी मित्रमंडळ माणगाव, कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, माणगाव तालुका शेतकरी उत्पादक कंपनी लि., छत्रपती करियर अकॅडमी आर्मी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र माणगाव, नवरात्र मित्रमंडळ माणगाव आदी संस्था-संघटनांचे सर्व पदाधिकारी व सभासद विशेष परिश्रम घेत असून या शिबिराची जोरदार तयारी आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

# वर्ल्डकपमध्ये दोन सुपर ओव्हरचा थरार

## दक्षिण आफ्रिकेची अफगाणिस्तानवर मात



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत बुधवारी (दि.११) दक्षिण अफ्रिका आणि अफगाणिस्तान आमने सामने आले होते. या सामन्यात एक नाही. तर दोन सुपर ओव्हर खेळवाव्या लागल्या. अफगाणिस्तानने झुंजार वृत्ती दाखवत सामना शेवटच्या क्षणापर्यंत सोडला नाही. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये मात्र दक्षिण अफ्रिकेने आपला अनुभव पणाला लावला अन् सामना चार धावांनी जिंकला.

दक्षिण अफ्रिकेने सहा फलंदाजांच्या मोबदल्यात १८७ धावा ठोकल्या. त्यानंतर अफगाणिस्तानचा संपूर्ण संघ १९.५ षटकात १८७ धावांवरच सर्वबाद झाला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानने फलंदाजी करीत १८ धावांचे आव्हान दक्षिण अफ्रिकेसमोर ठेवले होते. अझमतुल्ला ओमरझाईने दोन चौकार व एक षटकार लगावला, तर प्रत्युत्तरात फजलहक फारूकीने चांगली गोलंदाजी केली. आफ्रिकेकडून फलंदाजीत ब्रेविसने षटकार लगावला व त्यानंतर पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. मग स्टब्जने एक चौकार लगावला, तर पाचवा चेंडू डॉट गेला, मात्र अखेरच्या चेंडूवर स्टब्सने षटकार लगावल्याने सामना बरोबरीत सुटला. त्यामुळे दुसरी ओव्हर खेळवावी लागली.

दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये द. आफ्रिकेकडून ट्रिस्टन स्टब्स आणि डेव्हिड मिलर फलंदाजीला आले आणि अफगाणिस्तानचा अजमतुल्ला गोलंदाजी करत होता. पहिल्या चेंडूवर स्टब्सने षटकार खेचला. तर दुसऱ्या चेंडूवर एक धाव आणि तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्या. यानंतर सलग दोन चेंडूवर मिलरने षटकार खेचले. अखेरच्या चेंडूवर त्याने दोन धावा घेतल्या आणि आफ्रिकेने अफगाणिस्तानला विजयासाठी २४ धावांचे आव्हान दिले.

प्रत्युत्तरात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबी व अजमतुल्ला फलंदाजीला उतरले. आफ्रिकेच्या केशव महाराजने पहिला चेंडू डॉट बॉल टाकला, तर दुसऱ्या चेंडूवर नबी झेलबाद झाला. त्यानंतर रहमानुल्ला मैदानात आला. त्याने सलग तीन चेंडूंवर षटकार लगावले. सहावा चेंडू केशव महाराजने वाईड टाकला. अखेरच्या चेंडूवर पाच धावांची गरज असताना रहमानुल्ला मोठा फटका खेळताना झेलबाद झाला. यासह अफगाणिस्तानने सामना गमावला.

# उरण येथील क्रिकेट स्पर्धेत मोठी जुई संघ विजेता



**उरण : बातमीदार**

उरण कोटनाका येथील मैदानात सिद्धार्थनगर इलेव्हन संघातर्फे डी.के. ग्रुप चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत अर्णव इलेव्हन मोठी जुई संघाने प्रथम क्रमांक पटकविला.

द्वितीय क्रमांक साई माऊली मोरा, तृतीय क्रमांक विंधणे संघाने प्राप्त केला. त्याचबरोबर मालिकावीर आकाश (विंधणे) आणि उत्कृष्ट फलंदाज निनाद (मोठी जुई) ठरला. सर्वांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या वेळी डी.के. ग्रुपचे अध्यक्ष दिनेश गायकवाड, कुणाल म्हात्रे, बळीराम मसन, सनी भोईर, संकेत पाटील, ऋषिकेश कासारे, जयेश गायकवाड, लकी भिसे, नागेश गायकवाड, आदित्य भिसे, प्रेम गायकवाड, बहुजन समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष सुनील गायकवाड, रायगड प्रभारी राहुल बेनवाल, विकास निकाळजे आदी उपस्थित होते.

# श्रीलंका संघाला मोठा धक्का!

## स्टार खेळाडू हसरंगा दुखापतीमुळे वर्ल्डकपबाहेर



**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेचा सह-यजमान असलेल्या श्रीलंकन संघाचा मुख्य फिरकीपटू आणि मॅचविनर अष्टपैलू वानिंदू हसरंगा याला 'हॅमस्ट्रिंग'च्या गंभीर दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घ्यावी लागली आहे. त्यामुळे या संघाला मोठा धक्का बसला आहे.

हसरंगाला ही दुखापत आयर्लंडविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात झाली होती. त्या सामन्यात त्याने शानदार गोलंदाजी करत तीन बळी घेतले आणि श्रीलंकेला २० धावांनी विजय मिळवून दिला, मात्र गोलंदाजीदरम्यानच त्याला त्रास जाणवू लागला होता. अखेर त्याने स्पर्धेतून माघारीचा निर्णय घेतला.

एमआरआय स्कॅनमध्ये हसरंगाची दुखापत गंभीर असल्याने त्याला सावरण्यासाठी अनेक आठवडे लागणार आहेत. हसरंगा हा टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात श्रीलंकेसाठी सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. घरच्या मैदानावरील फिरकीला अनुकूल असलेल्या खेळपट्ट्यांवर तो श्रीलंकेचे सर्वात मोठे शस्त्र होता, पण आता यजमानांना त्याच्याविनाच पुढील प्रवास करावा लागेल.

वानिंदू हसरंगाच्या जागी श्रीलंकन संघात लेग-स्पिनर दुषण हेमंथा याचा समावेश केला जाणार आहे. हेमंथा हादेखील एक अष्टपैलू खेळाडू असून त्याने यापूर्वी देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. त्याला आता संधी मिळणार आहे.

# न्यूझीलंडच्या सलामीवीरांची विश्वविक्रमी भागीदारी

## विश्वचषकात यूएई संघावर सहज मात

**चेन्नई : वृत्तसंस्था**

टिम सिफर्ट आणि फिन लन या सलामीवीरांच्या विश्वविक्रमी भागीदारीच्या जोरावर न्यूझीलंडच्या संघाने युएईच्या संघाला १० विकेट्स राखून दणदणीत विजय नोंदवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना युएईच्या संघाने निर्धारित २० षटकात सहा बाद १७३ धावा करत किवी संघासमोर १७४ धावांचे टार्गेट सेट केले होते. चेपॉकच्या चेन्नईच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या सलामी जोडीने ९२ चेंडूत मॅच संपवली.




युएईच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना टिम सिफर्टने अवघ्या २३ चेंडूत अर्धशतकाला गवसणी घातली. त्याने ४२ चेंडूत १२ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २११.९०च्या सरासरीने ८९ धावांची नाबाद खेळी साकारली. २७ चेंडूत अर्धशतक पूर्ण करणाऱ्या फिन लन याने ५० चेंडूत पाच चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने नाबाद ८४ धावा केल्या. दोघांनी ९२ चेंडूत १७५ धावांची भागीदारी केली. टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासात कोणत्याही विकेटसाठी झालेली ही सर्वोच्च भागीदारी ठरली.

तत्पूर्वी युएईने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. यासह युएईच्या फलंदाजांनी शानदार फलंदाजी करत १७३ धावांची चांगली धावसंख्या उभारली. संघाचा सलामीवीर अर्यांश शर्मा आठ धावांवर झेलबाद झाला, पण कर्णधार मुहम्मद वसीम नाबाद राहत संघाला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेले. वसीमने ४५ चेंडूत चार चौकार व तीन षटकारांसह ६६ धावांची, तर अलिशान शर्फूने ४७ चेंडूत पाच चौकार व दोन षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. खालच्या फळीत मयंक कुमारने २१ धावांचे योगदान दिले. न्यूझीलंडकडून मॅट हेन्रीने दोन विकेट्स घेतल्या, तर जेकब डफी, लॉकी फर्ग्यूसन आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

# वर्ल्डकपमध्ये भारताचा सामना आज नामिबियाशी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताचा पुढील सामना गुरुवारी (दि. १२) संध्याकाळी ७ वाजता खेळवला जाणार आहे. हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये होणार आहे. पहिल्या सामन्यात भारताने अमेरिकेवर विजय मिळविला होता.

दरम्यान, तत्पूर्वी अचानक तब्येत बिघडल्यानंतर अभिषेक शर्मांला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक तपासणीत स्टमक इन्फेक्शन असल्याचे स्पष्ट झाले आहे.

डॉक्टरांच्या देखरेखीखाली अभिषेक शर्मावर उपचार सुरू असून सध्या त्याला ऑब्झर्वेशनमध्ये ठेवण्यात आले आहे. मंगळवार रात्रीपर्यंत तो रुग्णालयातच होता. त्याच्या प्रकृतीबाबत अद्याप अधिकृत मेडिकल अपडेट देण्यात आलेले नाहीत.

टीम मॅनेजमेंट आणि चाहते दोघेही अभिषेकच्या तब्येतीकडे लक्ष ठेवून आहेत. पुढील तपासणीनंतर त्याला डिस्चार्ज द्यायचा की नाही याचा अंतिम निर्णय डॉक्टर घेणार आहेत.


# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत आर्यन सिंहची 'सुवर्ण' कामगिरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

६९वी राष्ट्रीय शालेय कराटे स्पर्धा नुकतीच पोलीस सब-हेड क्वार्टर्स कार्यालय, बाऱ्हाणपूर, बारामती (पुणे) येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत अंडर १७ व अंडर १९ वर्षे मुले व मुली गटात देशभरातील नामांकित खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या अंडर १७ वर्षे मुलांच्या ७८ किलो वजन गटात मास्टर आर्यन धर्मेंद्र सिंह (इयत्ता अकरावी, वाणिज्य शाखा) याने दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले.

आर्यन सिंह हा पोदार इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ, नवी मुंबई येथील विद्यार्थी असून त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा, पालक तसेच संपूर्ण नवी मुंबईतील क्रीडा क्षेत्रात उत्साह वाढला आहे. आर्यनच्या या यशामागे शिरीष तळेकर व संकेत जेधे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धा कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या नेत्रदीपक कामगिरीबद्दल जपान कराटे दो केइबुकाई इंडिया फेडरेशनचे संचालक शिरीष किसन तळेकर तसेच सुवर्णा शिरीष तळेकर यांनी आर्यन सिंह याचे अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.




# माणगाव तालुकास्तरीय उडान क्रीडा महोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुकास्तरीय उडान २०२६ क्रीडा महोत्सवाचे आयोजन १४ व १५ फेब्रुवारी रोजी तालुका क्रीडा संकुल माणगाव या ठिकाणी करण्यात आले आहे.



डी.एस. कुलकर्णी फाउंडेशन इंदापूर पुरस्कृत ट्रॅक अँड बियाँड, मुंबई कांश स्पोर्टिंग हब एलएलपी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड प्रकाश वाघ, माणगाव तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, तालुका क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे यांच्या विशेष सहकार्याने क्रीडा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात धावणे, लांब उडी, स्टँडिंग बोर्ड जंप, गोळा फेक या स्पर्धांचा समावेश असून स्पर्धा ८ ते १७ वयोगटातील मुला-मुलींसाठी आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या माणगाव तालुक्यातील मुला-मुलींनी वयाचा पुरावा (मूळ जन्म दाखला अनिवार्य) सोबत आणावा. स्पर्धकांसाठी प्रति खेळासाठी २०० रुपये प्रवेश फी असून प्रत्येक विद्यार्थ्याला जास्तीत जास्त दोन स्पर्धा खेळता येतील. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ८६०५०५९३९८, ९८६०१७६६३, ९०११३७८१३९, ८०८७४६६५७४, ९८२००६१३९८ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.





**उलवे नोड** : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी उलवे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर मैदानाची पाहणी करून आढावा घेतला. त्यांच्यासमवेत ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, भाऊशेठ पाटील, साईचरण म्हात्रे, शरद कदम, सूर्यकांत ठाकूर, भार्गव ठाकूर, वसंतशेठ पाटील, विनोद नाईक, राहुल घरत, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.

# आशियाई नेमबाजीत मनु भाकरला रौप्यपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेतील तणावपूर्ण शूट ऑफमध्ये पराभव पत्करावा लागल्याने मनू भाकर हिचे सुवर्णपदक अगदी थोडक्यात हुकले. ऑलिम्पिकमधील दुहेरी कांस्यपदक विजेती मनूला २५ मीटर पिस्तूल इव्हेंटमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर भारताचीच ईशा सिंग हिने कांस्यपदक पटकावले.

२५ मीटर पिस्तूल ज्युनिअर अंतिम फेरीत नाम्या कपूर हिने थरारक शूट ऑफमध्ये विजय मिळवत सुवर्णपदक जिंकले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक जिंकणारी ती सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरली आहे. अंजली भागवतने २४ गुणांसह कांस्यपदक मिळवले. ज्युनिअर भारतीय संघानेही या प्रकारात सांघिक सुवर्णपदक पटकावले.

# आयुष म्हात्रेला सचिन तेंडुलकरकडून खास गिफ्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरने भारतीय युवा क्रिकेट संघाला अंडर-१९ विश्वचषक जिंकून देणारा कर्णधार आयुष म्हात्रे याच्या खेळाचे कौतुक केले आणि त्याला स्वतःची स्वाक्षरी केलेली एक विशेष जर्सी भेट दिली.



घरगुती क्रिकेटमध्ये आपल्या फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या आयुष म्हात्रेच्या खेळावर सचिन तेंडुलकर कमालीचा प्रभावित झाला आहे. केवळ कौतुक करूनच न थांबता सचिनने आयुषला प्रत्यक्ष भेटून त्याच्याशी संवाद साधला आणि त्याला भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी सचिनने त्याला आपली स्वाक्षरी केलेली जर्सी भेट दिली, जी कोणत्याही युवा खेळाडूसाठी एका मोठ्या पुरस्कारापेक्षा कमी नाही.

आयुष म्हात्रे हा मुंबई क्रिकेटमधील एक स्फोटक सलामीवीर म्हणून ओळखला जातो. रणजी चषकातील त्याने केलेल्या उत्कृष्ट शतकांमुळे त्याची तुलना अनेकदा दिग्गज खेळाडूंशी केली जात आहे. नुकत्याच झालेल्या आयपीएल लिलावातही त्याच्यावर मोठी बोली लावली गेली होती, ज्यामुळे तो प्रकाशझोतात आला.

# आयसीसीने नाड्या आवळताच भारतासोबत खेळण्यास पाक राजी

**कोलंबो : वृत्तसंस्था**

तळ्यात मळ्यातील भूमिका घेणारा पाकिस्तान सर्वच पर्याय संपत चालल्याने अखेर गुढघे टेकण्यास राजी झाला असून येत्या रविवारी (दि. १५) रोजी भारताविरुद्ध खेळण्याची तयारी या संघाने दर्शवली आहे.

पीसीबीने यापूर्वी भारताविरुद्ध खेळण्यासाठी तीन अटी आयसीसीसमोर ठेवल्या होत्या. यात वार्षिक महसुलातील वाटा वाढवून मिळावा, बांगलादेशसह तिरंगी मालिकेत भारताने सहभाग घ्यावा तसेच भारतीय संघाने हस्तांदोलन करावे यावर पाकिस्तानने यात भर दिला होता, मात्र आयसीसीने या तिन्ही अटी सपशेल फेटाळून लावल्या आणि हा डावदेखील फसल्याने पाकिस्तान क्रिकेट मंडळाने यू टर्नघेतल्याचे प्रातिनिधिक चित्र आहे.

यापूर्वी बांगलादेशने भारतात येण्यास नकार दिल्यानंतर त्यांना स्पर्धेतून बाहेर करण्यात आले होते. याच्या निषेधार्थ पाकिस्तान सरकारने १५ फेब्रुवारीच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली होती, मात्र आयसीसीकडे झालेल्या मॅरेथॉन बैठकांनंतर पाकिस्तानने आपला पवित्रा बदलला असून आता ते कोलंबोत भारताशी भिडण्यास सज्ज झाले आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com